शनिवार । २६ एप्रिल १९८० । ७५ पैसे

# माणूस

डोंबिवलीच्या परिसरातील उद्योजक....
त्यांची काही स्वप्ने आहेत.
ही स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी वैयक्तिक सुखाचा, कुटुंबाच्या सुखाचा विचार न करता ते जिवाचे रान करीत आहेत.
कारकुनी, मास्तरकी, डॉक्टरकी, वकिली अशा परंपरागत मळलेल्या वाटेने, चाकोरीतून न जाता वेगळ्या वाटेने जाण्याची इच्छा असणारे हे औद्योगिक आणि आर्थिक आघाडीवरचे सैनिक आहेत....

## या सैनिकांचा मार्ग आज रोखला जात आहे....

कर्नाटक, गोवा, गुजराथ ही राज्ये या तरुण व कर्तबगार उद्योजकांना सन्मानपूर्वक बोलावत आहेत....
डोंबिवली औद्योगिकक्षेत्रातील उद्योजक व त्यांचे प्रश्न....
अभ्यासाधारित लेख....पृष्ठ....९

## शिवाय

## पुण्यातील दोन जनता पक्षांचे दोन मेळावे पृष्ठ....६

## सप्रेम नमस्कार

नागपूरच्या विषमतानिर्मूलनशिबिराचा माणूसमधील वृत्तांत वाचला. मी बहुतेक वेळ शिबिराला हजर होतो. श्री. तांबे यांच्याबरोबर झालेल्या अनौपचारिक चर्चेत एक मुद्दा निघाला. तो महत्त्वाचा वाटल्याने येथे देत आहे.

उच्चनीचता मानणे म्हणजे ब्राह्मण्य. ढेकर 'आला' की 'आली' यावर भांडणारे देशस्थ अगर कोकणस्थही ब्राह्मण्यच जपत असतात.

मुळात संस्कृती भिन्न असू शकते. उच्चनीच नसते.

विषमता जोपासणाऱ्या ब्राह्मण्यावर हल्ला हवा; ब्राह्मणजातीत जन्म घेतलेल्यांवर नव्हे. महात्मा फुले व आंबेडकरांनाही हे मान्य होते.

अन्यथा फुल्यांनी ब्राह्मणजातीत जन्मलेला मुलगा दत्तक घेतला नसता व डॉ. बाबासाहेबांचे अनेक 'ब्राह्मण' सहकारी झाले तेही झाले नसते.

परंतु व्यवहारात ब्राह्मण्यावरचा हल्ला 'बामणांवर' घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातून दलितचळवळीची हानी होते.

शब्दात काय आहे असे शेक्सपियरने कितीही म्हटले तरी शब्दांना महत्त्व असतेच. कारण त्यांना 'असोशिएशन्स' असतात.

ब्राह्मणजातीचा सर्वसाधारण अनुभव कर्मठ-विषमता जोपासणारे असा काही जणांना असणे शक्य आहे.

तसेच ज्ञानार्जन, ज्ञानदान, संस्कार करण्याची शिक्षकी वृत्ती असाही अनुभव काहींचा असेल.

निर्व्यसनी माणसाला अगदीच 'भोट' असल्याचे हिणवले जाते.

ते भटांच्या जातीच्या गुणाची पावती का समजू नये ?

तात्पर्य इतर सर्वच जातींप्रमाणे ब्राह्मणजातीतील काही व्यक्ती चांगल्या व काही वाईट आहेत. त्यांच्या 'ब्राह्मण्यात' हे सर्व अंतर्भूत आहे.

तेव्हा उच्चनीचता-विषमता मानणे-याला दुसरा पर्यायी शब्द नाही का शोधता येणार ? जो कुठल्याही जातीच्या नावाशी संबंधित नसावा-

डोक्यातला 'मनू' जागा असणे अशा अर्थी.

भाषाशास्त्रज्ञ अगर लोकांनी पर्यायी शब्द सुचवून तो रूढ केला तर निष्कारण वाढणारी कटुता व गैरविश्वास कमी व्हायला मदत होईल.

१५ एप्रिल — अरुण लिमये, पुणे

## मुंबई वार्ता

किरण जोग

# व्ही. टी. ते सोलापूर

गाडीत बरोबरचा प्रवासी कोण असेल याविषयी माझ्या मनात नेहमीच उत्सुकता असते. प्रवासात गप्पा मारणारा, ज्याच्याकडून आपण नवीन माहिती जाणून घेऊ असा सहप्रवासी मिळणे म्हणजे 'शुभ प्रवास' ही कल्पना साकार होणेच होय. गेला पंधरवडाभर एखाद्या कॉंग्रेस (इं) च्या नेत्यास भेटून त्याच्या हालचाली जाणून घेण्याचा प्रयत्न करावा, तसेच कॉंग्रेस (इं) तील नव्या-जुन्या वादाचे स्वरूप जाणून घ्यावे असे माझ्या मनात होते.

योगायोगाची गोष्ट अशी की नुकताच सोलापूरला जात असताना गाडीत सहप्रवासी जे होते त्यामुळे कॉंग्रेस (इं) च्या नेत्यांना भेटण्याची इच्छाही पूर्ण झाली व एक मनमोकळी मुलाखतही मिळाली. हे सहप्रवासी होते माजी मंत्री हल्लीचे कॉंग्रेस (इं) त प्रवेश केलेले व एके काळचे श्री. शरद पवार यांचे सहकारी श्री. सुशिलकुमार शिंदे. व्ही. टी. ते सोलापूर प्रवास त्यांनी गाडीने करा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : अट्ठेचाळीसावा
२६ एप्रिल १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

यचे ठरवले होते, ते खरे तर आराम मिळण्यासाठी ! परंतु त्यांना आराम मिळू न देण्याचा मी चंगच बांधला होता !

आधी विषय निघाला तो त्यांच्या काँग्रेस (इं) मधील प्रवेशाचा. त्यांनी सांगितले की, जरी मी शरद पवारांच्या सरकारात होतो तरी ते तत्त्वासाठी नव्हे तर शरद पवार यांच्या मैत्रीखातर ! ही मैत्री अजूनही कायम आहे असे सांगून शिंदे म्हणाले की, राजकीय मैत्रीचा अस्त झाला असला तरी मी शरद पवार यांना आजही गुरु मानतो.

आपण काँग्रेस (इं) त का प्रवेश केला याची कारणमीमांसा सांगताना श्री. शिंदे यांनी काही वेगळेच मुद्दे मांडले. त्यांच्या मते "लोकसभा निवडणुकीत अरस कांग्रेस खरी की काँग्रेस (इं) खरी 'काँग्रेस' या प्रश्नावर आम्ही लोकांचा कौल मागितला होता. लोकांनी स्पष्ट असा कौल दिल्यावर तो मानणे योग्यच होते. शिंदे असेही म्हणाले की "काँग्रेसचे स्वरूप येथून तेथून एकच ! मी काँग्रेसच्या एका गटातून दुसऱ्यात गेलो म्हणजे पक्षांतर केले असे नाही."

आपण काँग्रेस (इं) मध्ये राहून आतमधूनच वाईट प्रवृत्तींना विरोध करीत राहू हे शिंदे यांनी स्पष्ट केले. निष्करण वेगळी काँग्रेस उभी करण्यापेक्षा शरद पवारांसह सर्वांनीच कांग्रेस (इं) मध्ये यावे व हरियाणाचा कित्ता गिरवावा असे आपणास वाटत होते असे सांगून ते म्हणाले की, "दुर्दैवाने हे होऊ शकले नाही म्हणून मी वैयक्तिकरीत्या काँग्रेस (इं) त प्रवेश केला."

आपण मुख्यतः मार्क्सवादी कम्युनिस्टांशी लढणार आहोत हेही त्यांनी स्पष्ट केले. या देशात शिंदे यांना सर्वांत जास्त धोका वाटतो तो कम्युनिस्टांचा! माझ्याशी बोलताना केरळ, प. बंगाल यांचे उदाहरण देऊन शिंदे यांनी हे स्पष्ट केले की, या देशात परकीय राजकारणाची 'री' ओढण्याचे प्रकार ही कम्युनिस्ट मंडळी करीत आहेत. "या प्रकारावर मी सतत वक्तव्ये केली आहेत." असे सांगून "आपण सतत परक्या देशात निष्ठा ठेवणाऱ्यांवर हल्ले चढवू" असेही त्यांनी सूचित केले !

विविध विषयांवर गप्पा मारताना सुशीलकुमार शिंदे यांनी एका गोष्टीविषयी अत्यंत खेद व्यक्त केला. ती गोष्ट म्हणजे कामाच्या व्यापामुळे साहित्य व वाचन यांच्याकडे नियमितपणे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळत नाही. पूर्वी आपण लिखाण करीत असू परंतु हल्ली विस्तृत अनुभव असूनही लिखाण करता येत नाही' असे ते म्हणाले.

'आपण गेली ५ वर्षे मंत्री असताना विविध अनुभव (कडू-गोड) आपल्याला भरपूर आले आहेत.' 'असे सांगून ' जर येत्या विधानसभा निवडणुकांनंतर मंत्रीपदाची जबाबदारी संभाळावी लागली नाही तर (व तसे झाल्यास बरेच-इति शिंदे) आपण (माय् फाइव्ह इअर्स इन् मिनिस्ट्री) या नावाचे पुस्तक लिहिणार आहोत व प्रशासन आणि राजकारण यांच्यातील अनेक गोष्टींवर प्रकाश टाकणार आहोत' असे ते म्हणाले.

पण बहुधा राजकरणी लोकांची पुस्तके पूर्ण होत नाहीत. जसे अटलबिहारी वाजपेयी आणीबाणीत तुरुंगात लिहीत असलेले हॉस्पिटलवरचे पुस्तक अजून अपूर्णच आहे तसे शिंदे यांचे पुस्तक अपूर्ण राहते, का ते त्यामागे नेट लावून लिखाण पूर्ण करतात हे पहायचे.

गप्पांच्या ओघात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विषय निघाला. मला वाटले, ते संघावर टीका करतील; परंतु उलटेच झाले! 'आपण रा. स्व. संघावर कधीही टीका केली नाही' असे स्पष्ट करून ते म्हणाले, 'या मातीशी निष्ठा असतात. कोणताही पक्ष अथवा संघटना यांना मी मानतो.'

काँग्रेस (इं) मध्ये आपण सत्तेसाठी आलो नसून येथेही आपण एकाधिकारी प्रवृत्तीला विरोध करू असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या पक्षात राहून आपण तहहयात डावी विचारसरणी असलेले व परदेशावर निष्ठा ठेवणारे लालभाईंचे राजकारण यशस्वी होऊ नये म्हणून प्रयत्न करू असेही त्यांनी सांगितले.

'आजच्या मंत्र्यांनी वा सरकारी पक्षाच्या मंडळींनी राजधानीत राहून चर्चा न करता प्रत्यक्ष खेडचात जाऊन 'फील्ड-वर्क' मध्ये लक्ष देण्याची आवश्यकता आहे' असेही श्री. शिंदे म्हणाले. 'दलित व सवर्ण यांच्यातील दरी आपोआप कमी होईल' असे सांगून ते म्हणाले की 'दलितांना समजावून घेण्याची सवर्णांची दृष्टी आपल्याला अनेक ठिकाणी दिसली. त्यामुळे 'दलितत्वाचा' बागुलबुवा करून आपण स्वतःची 'लॉबी' निर्माण केली नाही तर सर्वांशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला !'

सोलापूर आले व स्टेशनवरून घोषणा आल्या 'देश की नेता इंदिरा गांधी' 'सुशीलकुमार शिंदे 'जिंदाबाद !' शिंदे कार्यकर्त्यांत मिसळले आणि 'नेते' झाले !

□


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

# देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किमत : १० रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# मौज प्रकाशनाचे २७५ वे प्रकाशन

पुस्तकप्रकाशनाच्या समारंभाची गंमत असते. अध्यक्षमहाराज फितीची गाठ सोडवून रंगीत कागदाच्या आवरणातून पुस्तक बाहेर काढतात व ते उंच धरून त्याचे प्रकाशन झाले असे घोषित करतात. मग एक एक वक्ता येऊन बोलून जातो. त्यातला एखादा वक्ता असेही सांगतो की, 'तासापूर्वी माझ्या हातात पुस्तक आलंय. मी ते फक्त चाळलंय !' आणि असं बोलून वक्तृत्व ही एक कला आहे असं सिद्ध करीत तो वक्ता तासभर पिळीत राहतो. असे सगळे वक्ते बोलून झाल्यावर आभारप्रदर्शन होऊन प्रकाशनसमारंभ संपतो.

१२ एप्रिल रोजी संध्याकाळी टिळक स्मारक मंदिरात मौज प्रकाशनाने काढलेल्या डॉ. अनिल अवचट यांच्या 'माणसं' या पुस्तकाचा प्रकाशनसमारंभ मात्र असा झाला नाही. हा समारंभ 'मौजे'च्या प्रथेत नेटका व साक्षेपी झाला. त्याला खोली कमी आली तरी विस्तारामुळे तिची भरपाई झाली. वक्त्यांनी पुस्तक नीट वाचलेले होते आणि वक्ते आपापल्या क्षेत्रातले जाणते अनुभवी कार्यकर्ते होते. पुस्तकाचे लेखक अनिल अवचट आपल्या प्रस्तावाच्या भाषणात म्हणाले,

'मी लिहिलेल्या 'माणसं' या पुस्तकाचा आज प्रकाशनसमारंभ आहे. माझ्या पुस्तकातील विषय उपेक्षित आहेत. त्या उपेक्षित विषयांवर जाहीर चर्चा व्हावी हा या समारंभाचा हेतू. त्यासाठी विषयांशी संबंधित तीन वक्ते इथे बोलणार आहेत. त्यापैकी पहिले बाबा आढाव. हे झोपडपट्टी व हमालचळवळीचे प्रमुख आहेत. दुसरे, आमदार दौलतराव भोसले. यांनी सदतीस मुक्त जातींना एक करून मुक्तजातिसंघ स्थापन केला. तिसरे, प्रा. सुभाष जोशी. हे निपाणीस विडी कामगार संघटनेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी उपेक्षित विडीकामगार संघटित केले. ¤

त्या दिवशी व्यासपीठावर, सर्वच उपेक्षितांचे जग होते. वक्ते उपेक्षितांचे, पुस्तक उपेक्षितांबद्दल व पुस्तकाचे प्रकाशन ज्यांनी केले तेही उपेक्षितांचे उपेक्षित प्रकाशक. श्री. पु. भागवतांना उपेक्षितांचे उपेक्षित प्रकाशक म्हणावे याचे पुष्कळांना नवल वाटेल. कारण श्री. पुंच्या मौज प्रकाशनाने सर्वांत जास्त महाराष्ट्र सरकारचे पुरस्कार मिळवले आहेत आणि सर्वांत जास्त अकॅडमीची पारितोषिके पटकावली आहेत. पारितोषिकांचे सोडा; पण त्यांच्याकडे एक पुस्तक प्रसिद्ध होणे किंवा त्यांच्या सत्यकथेत एक कथा येणे हे मानाचे पान समजले जाते. उदयोन्मुख लेखकांचे ते सल्लागार व आधार आहेत. पीएच. डी. करणाऱ्या भाषेच्या प्राध्यापकांना मौज व सत्यकथेच्या जुन्या फाइल्स अभ्यासाव्याच लागतात. लेखकांना त्यांची जी पत्रे येतात त्यातील शब्दांचे खोल अर्थ हुडकण्याचा आनंद कित्येक दिवस त्या लेखकांना पुरतो. मोठमोठे टीकाकार श्री. पुं. च्या तोंडावर काय भाव उमटतात इकडे लक्ष देऊन असतात. श्री. पुं. नी जेवढे नवे प्रवाह वाङ्मयात सोडले तेवढे कुणी सोडले नसतील !

असे असूनही मी त्यांना उपक्षित म्हणावे? होय ! त्यांच्या प्रकाशनाची (म्हणजे पुस्तकप्रकाशन व सत्यकथा) उपेक्षाच झाली आहे. मी स्वतः त्यांचा लेखक आहे. मला वाटतं माझी दहाएक पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. कदाचित एकदोन कमी असतील तर ती लौकरच होतील. थोडक्यात त्यांच्याबद्दल सांगण्याचा मला अधिकार आहे. माझी 'देव चालले' कादंबरी त्यांनी प्रकाशनासाठी घेतल्यावर मी त्यांना सहजच विचारले, 'आवृत्ती किती काढता?' खरे हा प्रश्न विचारण्याइतका व्यवहार माझ्यात नाही. ते गालात हसून म्हणाले, किती आवृत्ती आम्ही काढतो असे तुम्हाला वाटते? मी म्हटलं, 'मला काही कल्पना नाही; पण लघुकथासंग्रह हजार व कादंबरी दोन हजार काढतात असं म्हणतात.' श्री. पु. पुन्हा हसले व म्हणाले, पेंडश्यांच्या गारंबीच्या बापूची किती आवृत्ती काढली असेल?' मी म्हटलं: 'मला कशी कल्पना येणार?' ते म्हणाले, 'अकराशे. आज आठ वर्षे झाली. अजून शंभर (दोनशे?) कॉपीज शिल्लक आहेत !'

तुम्ही विचाराल, हे ऐकूनही तुम्ही त्यांना कादंबरी दिलीत का? हो दिली. 'विना मोबदला साहित्यनिर्मिती' या कालखंडातला मी लेखक. लिखाणातून पैसे मिळविण्याची तेव्हा कल्पनाच नव्हती. बहुतेक मी व्यवहाराची गोष्ट विचारले म्हणून त्यांनी त्याच वेळी मला पुढचाही व्यवहार सांगून टाकला. ते म्हणाले, 'आम्ही करारपत्र वगैरे करीत नाही. आम्ही हजाराची आवृत्ती काढतो. दहा टक्के रॉयल्टी देतो. रोख हवी असली तर आठ टक्के. खरे आठ टक्के परवडत नाही. वर्ष झाले की रॉयल्टीचा चेक व विक्रीचे स्टेटमेंट येते. हाच करार ! स्टेटमेंट कोर्टातही चालते. बाकी आम्ही लेखकाला मोकळे ठेवतो. त्या पुस्तकाचे भाषांतर, चित्रपट, नाटक, सर्व हक्क लेखकाचे. आवृत्ती संपल्यावर त्यानं आम्हाला दिली

तर आम्ही दुसरी काढू! दुसऱ्या कुणाला त्याला पुस्तक द्यावयाचे असेल तर तो मोकळा आहे.

ही मी देव चाललेल्या वेळची गोष्ट सांगतो आहे. यानंतर लौकरच त्यांचं मला पत्र आलं, "यापुढे आम्ही जी पुस्तके काढू त्याला दहाऐवजी पंधरा टक्के रॉएल्टी देणार आहोत."

त्यानंतर आज ३० वर्षे झाली. आमच्यातला व्यवहार सुखाने चालू आहे!

¤

समारंभात पहिले व्याख्यान बाबा आढाव यांचे झाले. ते म्हणाले, "अवचट यांच्या पुस्तकाच्या साहित्यिक गुणवत्तेपेक्षा त्यातील विषयावर मी बोलतो. अवचट कॅमेऱ्याप्रमाणे चित्र टिपतात... अवचट ज्या वर्गातून आले आहेत त्या मध्यमवर्गाने हमाल वगैरे समाजातील सनातन घटकांची जी उपेक्षा केली त्याची खंत त्यांना आहे.... प्रत्येक ठिकाणी त्यांनी हमालांच्या वगैरे जीवनाची मध्यम व श्रीमंतवर्गाच्या जीवनाशी तुलना केली आहे. जर खंत वाटू लागेल तर प्रश्न सुटेल.

झोपडपट्टींबद्दल अवचट म्हणतात, "झोपडपट्टी ही माणसाची जनावरं करण्याचा प्रचंड कारखाना आहे. हे या लोकांचे दुःख या लोकांनी निर्माण केलेले नाही. खेड्यातून आलेली ही माणसं..."

यानंतर बाबा आढावांनी, कार्पोरेशनमध्ये झोपडपट्टातल्या लोकांसाठी घरे वगैरे सोयी करण्यासंबंधी प्रश्न निघाला तेव्हा कुणी तरी 'झोपडपट्टीतल्या लोकांना संडास व नळ यांची सोय करून दिली तर खेडेगावच्या लोकांना शहरांत येण्याचे आमंत्रण मिळेल' असे मत मांडल्याचे सांगितले. हे मत माझ्याही मते दुष्ट आहे; पण मोठ्या अर्थानं त्यात सत्यांश आहे. आयर्लंडमध्ये एक प्रयोग करण्यात आला. तेथेही खेडेगावे ओस पडली. डब्लिन वगैरे सारख्या शहरात गलिच्छ वस्त्या वाढल्या. खेड्यात फक्त म्हातारी माणसे व वाळकी जनावरे उरली. एका गृहस्थाने खेड्यातून शहराकडे जाणारा हा ओघ परत यावा म्हणून कल्पना लढवली. त्याने एक खेडेगाव प्रयोगाला घेतले. त्याने तिथे चित्रपट दाखविता येईल किंवा नाचासाठी नागरिकांना जमता येईल असा एक हॉल बांधला. मग त्याने तिथे एक वाचनालय सुरू केले. मग खेळासाठी मैदाने केली. नळ-संडास वगैरेची उत्तम व्यवस्था केली व सरतेशेवटी त्याने गावातील लोकांना काम मिळेल अशासाठी एका छोट्या कारखानदाराला आपला कारखाना त्या खेड्यात आणण्यास उद्युक्त केले. काही दिवसांतच त्या खेड्यातून शहरात गेलेले लोक परत येऊ लागले व लौकरच शहरात दूषित हवेत, दूषित पाणी पीत आणि फूटपाथवर झोपणारे त्या गावचे गावकरी परत खेड्यात आले.

बाबा आढाव व्याख्यानात एके ठिकाणी म्हणाले, 'झोपडपट्टी सदैव वाढत जाणारी घटना आहे.' ते अगदी बरोबर आहे. माझ्या मते ज्या पद्धतीने आज झोपडपट्टीच्या चळवळी होत आहेत व ज्या सोई करण्याचा प्रयत्न चालू आहे त्या केवळ मलमपट्ट्या आहेत. बाबा आढावांसारख्या पुढाऱ्यांनी झोपडपट्ट्यांच्या प्रश्नाकडे आवाका मोठा करून पहावे. ही घटना मध्यमवर्गीयांच्या उपेक्षेतून निर्माण झाली आहे वगैरे विचार त्यांनी मनातून काढून टाकावे. खेड्यांतून शहराकडे येणारे लोंढे कसे थांबवावयाचे (म्हणजेच शहरातील झोपडपट्टी कशी थांबवावयाची) हा प्रश्न सर्व जगभर आहे. 'शहरे सोडा' अशी चळवळ सुरू केली तर उपाय मिळावा.

¤

यानंतर भटक्या जमातींचे संघटन करणारे आमदार भोसले म्हणाले, 'एकनाथांची भटक्या जमातीची भारुडे आहेत. हे लोक कुठून आले? शिवाजीमहाराजांच्या वेळी तीनशेसाठ किल्ले होते. त्या प्रत्येक किल्ल्यात कायम राहणारी शिबंदी होती. किल्ले निकामी झाल्यावर ही शिबंदीची मंडळी कुठे गेली? आजच्या भटक्या जमातीचे तेच पूर्वज असतील. या मंडळींना धरणीचा आधार नव्हता... भटक्या जमातीतील लोकांना स्थिर केले पाहिजे हा विचार अवचट यांच्या पुस्तकात नाही. भटक्या जमातीतील लोक शोधून काढण्याचे काम अजून चालूच आहे. आम्ही आमचं काम राजकारणापुरतं सीमित केलं आहे. कारण भटक्या जमातींचा एक प्रश्न आर्थिक आहे. अवचटसारख्यांनी सामाजिक बाजू बघावी. हरिजन-गिरिजन यात मुक्त जमातीही घाला.-'

या मुक्त जमाती म्हणजे मोरपिसे लावून आमच्या घरापुढे येणारा वासुदेव किंवा नंदीबैल घेऊन येणारा. ही जर मुक्तजमातीत असतील तर त्यांच्याबद्दल मला पूर्ण प्रेम व सहानुभूती आहे. आता नंदीवाला नंदी परवडत नसल्यानं नुसतं घुमघुम वाजवीत येतो तेव्हा माझे डोळे पाण्याने भरून येतात. उद्या वासुदेव जर शर्ट-लेंगा घालून हातात वासुदेवाची खूण म्हणून दोन मोरपिसं घेऊन आला तर कुणालाही खेद होईल. आलेल्या यंत्रयुगात, बदलत्या समाजव्यवस्थेत मागील काळी सुखात नांदत असलेली ही मुक्त मंडळी वाऱ्यावर जावी यात आपल्या सर्व समाजाची खालावलेली बौद्धिक पातळी व कोणत्याही सामाजिक योजनेचा अभाव या दोन्ही गोष्टी दिसतात.

¤

श्री. पु. रा. भागवतांनी उपेक्षितांवरचे पुस्तक काढावे हे त्यांचे सगळीकडे कसे लक्ष असते याचे द्योतक आहे. आभाराच्या भाषणात शेवटी ते म्हणाले की, 'क्षेत्रात काम केलाय त्यांचे पुस्तक प्रसिद्ध करावे. त्यात आपोआपच कला येते.' हे मला एवढे बरोबर वाटत नाही. माझा एक छंद आहे. माझ्या परिचयातील वृद्धांना (स्त्री व पुरुष) मी त्यांच्या त्यांच्या क्षेत्राबद्दल आपले जीवनचरित्र लिहिण्यास सांगतो. एक तर ते दोन पानात संपते, नाही तर काही तरी पाल्हाळिक होते. गृहिणी तशा सर्वच स्त्रिया असतात; पण ती एक गृहिणी, लक्ष्मीबाई टिळक, तिलाच फक्त जीवन लिहिता आले. ज्याला आपल्या कल्पना सांगण्याची उपजत कला आहे तोच ते सांगू शकतो. डॉ. ए. जी. क्रोनिन यांची पुस्तके वाचून 'अरे! आमचेही या तोडीचे अनुभव आहेत-आम्ही लिहू शकतो!' असे म्हणून एका डॉक्टराने मला दोन-चार पाने लिहून आणून दाखविली. त्याचे सगळे अनुभव त्या चार पानात जंत्रीवजा लिहून संपले होते.

म्हणूनच भागवतांचा हा सिद्धान्त मला एवढासा मान्य नाही. तरी त्यांची पुस्तके निवडण्याची शक्तीही प्रतिभेतच जमा व्हावयास हवी. बरे झाले ते लेखक झाले नाहीत. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांचे विषयच पाहून कुणीही भांबावून जाईल. पन्नास साली त्यांनी पहिले पुस्तक काढले. आज तीस

वगैनी ते हे अवचटांचे २७५ वे पुस्तक काढीत आहेत. संख्येच्या दृष्टीने हा विक्रम नाही; पण गुणवत्तेच्या दृष्टीने आहे. ती गुणवत्ता त्यांना अवचट यांच्या पुस्तकात दिसली म्हणून त्यांनी ते काढले यात संशय नाही.

¤

तिसरे भाषण निपाणीच्या तंबाखू कामगारांचे संघटक प्रा. जोशी यांचे झाले. या सर्व भाषणात ते कळकळीचे झाले. भाषणारंभी ते म्हणाले, 'वृत्तपत्रसृष्टीच्या पलीकडे जे जग आहे ते उजेडात आणण्याचे काम अनिलनी केले.' नंतर त्यांनी निपाणीच्या तंबाखू स्त्रीकामगारांच्या हालाची जी कहाणी सांगितली ती ऐकून कुणाचेही हृदय फाटावे. विसाव्या शतकात, वरून स्फुटनिक पहात असता, मध्ययुगीन वाटावे असे अनन्वित प्रकार या तंबाखू-कामगारांबाबत व्हावे हे ऐकून खरे वाटत नाही. त्यांनी एक रास्त गाऱ्हाणे मांडले. ते म्हणाले, 'पुण्यात दोनशेचा मोर्चा निघाला तर तो महाराष्ट्राचा प्रश्न होतो. निपाणीत दहा हजार तंबाखू कामगारांचा मोर्चा निघाला तर तो निपाणीचासुद्धा प्रश्न होऊ शकत नाही! महाराष्ट्राचा दूरच! निपाणीत तंबाखूच्या ढिगाखाली स्त्रिया मरतात; पण कुठे बातमी नाही! निपाणी बेट झालय. ना धड महाराष्ट्राचे ना कर्नाटकाचे. जर कुणी या तंबाखू कामगार स्त्रियांची बाजू घेतली तर त्याला नोकरीतून काढलं जातं! मग ती नोकरी कुठलीही असो. मला काढलं.!"

शेवटी त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला, देशातील संघटित कामगारांचे या असंघटित कामगारांबाबत काही कर्तव्य आहे की नाही? असंघटित कामगारांबद्दल त्यांना काही प्रेम आहे का? संघटित कामगार ब्राह्मण व आम्ही असंघटित कामगार अस्पृश्य अशी स्थिती झाली आहे!'

भारतात कामगारसंघटनेचा जो बोजवारा उडाला आहे त्याच्या एका कारणावर त्यांनी बोट ठेवले.

¤

असो. या तीन व्याख्यानांनंतर सरदार यांचे भाषण होऊन श्री. पु. यांनी आभार मानून कार्यक्रम संपला. आणखी एक चांगले पुस्तक मौजप्रकाशनाच्या खजिन्यात जमा झाले. ते प्रसिद्ध करीत असलेल्या साहित्याच्या मूल्यांबद्दल कुठेही संदेह नाही. अरविंद गोखले हे कॉंटिनेंटल प्रकाशनासाठी वर्षातल्या मराठी निवडक कथांचा संग्रह काढीत. ते मला एकदा म्हणाले होते की, 'शेवटी कुणी काही म्हटले तरी मौज व सत्यकथा (मौज प्रकाशने) यांतीलच गोष्टी निवडीत जास्त संख्येने येतात.'

मौज प्रकाशनाच्या यशाचे वाटप करताना कै. वि. पु. भागवत यांचा सिंहाचा वाटा विसरता येत नाही. त्यांचा वाटा सिंहाचा होता हे आज लक्षात येतंय. मौजप्रकाशनाच्या यशाचे दुसरे मानकरी राम पटवर्धन. श्री. पु. यांच्या बरोबरीने त्यांनी संपादनाची धुरा वाहिली. वाङ्मयाची जाण असलेल्या या दोघांत २७५ पुस्तके व तीस वर्षे मौज व सत्यकथा यांचे अंक निघून त्यांच्यातले सहकार्य अबाधित रहावे ही मराठीतील अपूर्व गोष्ट कुणाच्या लक्षात आलेली नाही, ती मी आणून देतो. मी म्हटलेच की तीस वर्षांत दोनशेपंचाहत्तर प्रकाशने हा काही वेग नाही; पण लहानपणी वाचलेली ससा व कासव ही गोष्ट आठवावी. त्यातले जे सशाला जिंकणारे कासव ते हेच. त्याच कासवाने या जन्मी मौज प्रकाशन म्हणून जन्म घेतला. हे गुपित मी तुम्हाला म्हणून सांगतोय.

आता लौकरच मौजप्रकाशनाचे २७६ वे प्रकाशन (ले. दि. बा. मोकाशी) बाहेर पडावे व त्यांनी तीनशेव्या प्रकाशनाकडे वाटचाल सुरू करावी, ही शुभेच्छा व्यक्त करतो.

□

# विधानसभा निवडणुका

## चित्र कितपत बदलेल?

वा. दा. रानडे

देशातील नऊ राज्यांत येत्या २७ व ३० मेस विधानसभा-निडवणुका होत आहेत. त्यात लोकसभा-निवडणुकांसारखेच यश इंदिरा कांग्रेस मिळवील की काही राज्यात चित्र बदलण्याची शक्यता आहे याचा विचार मुख्यत: लोकसभा-निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येथे करीत आहे.

ज्या नऊ राज्यांत विधानसभा-निवडणुका व्हावयाच्या आहेत तेथे प्रमुख राजकीय पक्षांना जागा व शेकडा मते पुढीलप्रमाणे मिळाली. (तक्ता पान ५ वर)

या आकड्यांवरून असे दिसले की नऊ राज्यांपैकी गुजरात, महाराष्ट्र, ओरिसा व पंजाब या चार राज्यांत इंदिरा कांग्रेसला ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली. विरोधी पक्षांनी समझोता केला तरीही ते तेथे फार जागा मिळवू शकणार नाहीत. बिहार व उत्तर प्रदेशांत मात्र जनता व लोकदल यांची एकत्रित मते इंदिरा कॉंग्रेसपेक्षा जास्त आहेत. बिहारमध्ये इंदिरा कॉंग्रेसला ३६.४१ टक्के मते तर लोकदल व जनता यांना मिळून ४०.१७ टक्के मते आहेत. इंदिरा कॉंग्रेसने जिंकलेल्या ३० जागांपैकी २२ मतदारसंघात जनता व लोकदल यांची एकत्रित मते इंदिरा कॉंग्रेसपेक्षा जास्त आहेत. याचा अर्थ जनता पक्षात फूट नसती तर या २२ जागा जिंकून त्याला बहुमत मिळाले असते; पण जनता व लोकदल यांनी आपसात लढून इंदिरा कॉंग्रेसला विजय मिळवून दिला!

उत्तरप्रदेशात इंदिरा कॉंग्रेसने जिंकलेल्या ५१ जागांपैकी फक्त ८ मतदारसंघात त्या पक्षास लोकदल आणि जनता यांच्या एकत्रित मतांपेक्षा जास्त मते आहेत. अल्मोडा,

नैनिताल, रायबरेली, फैजाबाद, बहरिच, गोंडा आणि अलाहाबाद हे ते मतदारसंघ. तेथेही इंदिरा काँग्रेसची मते लोकदल व जनता यांच्या एकत्रित मतांपेक्षा फक्त काही हजारांनी जास्त आहेत. उलट बाकीच्या ७७ मतदारसंघात लोकदल आणि जनता यांची एकत्रित मते इंदिरा काँग्रेसच्या मतांपेक्षा पन्नासहजार ते एक लाखाने जास्त आहेत.

याचा अर्थ लोकदल आणि जनता यांनी समझोता केला तर बिहार व उत्तरप्रदेशात विधानसभेच्या बहुसंख्य जागा ते मिळवू शकतील.

राजस्थानमध्ये इंदिरा काँग्रेसला ४२·६६ टक्के मते मिळाली. लोकदल आणि जनता यांना मिळून मते ४२·५३ टक्के म्हणजे जवळजवळ तेवढीच मिळाली आहेत. तेथेही इंदिरा काँग्रेसला बहुसंख्य जागा मिळाल्या त्या मुख्यतः जनता आणि लोकदल यांची मते आपसात विभागली गेल्याने. ही मतविभागणी झाली नसती तर जनतापक्षाने बारा जागा अधिक मिळविल्या असत्या म्हणजे एकूण २५ पैकी १६ जागा जिकल्या असत्या. फक्त पाच मतदारसंघात इंदिरा काँग्रेसला ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली आहेत. ते सोडून बाकीच्या वीस मतदारसंघांचे कक्षेत येणाऱ्या विधानसभा–जागांबाबत जनता आणि लोकदल यांनी समझोता केला तरी बहुसंख्य जागा मिळविणे त्यांना शक्य होईल.

जनता व लोकदल यांनी या तीन राज्यात जरी समझोत्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला तर इंदिरा लाट तेथे थोपविता येईल.

मध्यप्रदेशात ४० पैकी ३५ जागा जिंकून जागांच्या दृष्टीने इंदिरा काँग्रेसने मोठा विजय मिळविला असला तरी त्या पक्षास मते ४६·५२ टक्के मिळाली. जिंकलेल्या ३५ जागांपैकी फक्त १३ जागा इंदिरा काँग्रेसने पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतांनी जिंकल्या आहेत. सात मतदारसंघात विरोधी पक्षांची एकत्रित मते इंदिरा काँग्रेसपेक्षा जास्त आहेत. ज्या जागा इंदिरा काँग्रेसने ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या त्या मतदारसंघात विरोधी पक्षांनी आपली शक्ती एकवटली तर त्यांना अधिक यश मिळू शकेल.

तामिळनाडूमध्ये प्रादेशिक पक्षांशी आघाडी करूनच इंदिरा काँग्रेसने आपले बळ वाढविले. १९६७ मध्ये ३, १९७१ मध्ये ९, १९७७ मध्ये १४ आणि १९८० मध्ये ३९ पैकी २० म्हणजे बहुसंख्य जागा मिळविण्यापर्यंत इंदिरा काँग्रेसचे बळ वाढले. १९७१ व १९८० मध्ये द्र. मु. क.शी तर १९७७ मध्ये अण्णा द्र.मु क.शी इंदिरा काँग्रेसने आघाडी केली होती. प्रादेशिक पक्षातील फुटीचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळाला आणि १९७१ मध्ये आघाडीत दुय्यम भूमिका स्वीकारणाऱ्या काँग्रेसने १९८० मध्ये प्रमुख घटकाचे स्थान मिळविले व द्र. मु. क. ला दुय्यम भूमिका स्वीकारण्यास भाग पाडले. या लोकसभा–निवडणुकीच्या वेळी दुय्यम स्थान आम्ही स्वीकारले; पण राज्यपातळीवर आमचाच पक्ष आघाडीचा प्रमुख घटक असला पाहिजे आणि त्याला मुख्यमंत्रिपद मिळाले पाहिजे असा आग्रह द्र. मु. क. चे नेते धरीत आहेत. इंदिरा काँग्रेसच्या नेत्यांना ते मान्य नाही. राज्यपातळीवरच्या आघाडीतही त्यांना प्रमुख स्थान व मुख्यमंत्रिपद हवे आहे. दोन्ही बाजूंनी आग्रही भूमिका सोडल्या नाहीत तर त्यांची आघाडी मोडण्याचा संभव आहे; पण ती वेळ इंदिरा काँग्रेस येऊ देईल असे वाटत नाही. द्र. मु. क. ला सध्या मुख्यमंत्रिपद देण्याचे इंदिरा काँग्रेस मान्य करील व काही काळाने त्या पक्षात फाटाफूट घडवून राज्याची सूत्रे आपल्या हाती आणण्याच्या दृष्टीने हालचाली करण्याचा संभव आहे. अण्णा द्र. मु. क. व द्र. मु. क. हे दोन्ही पक्ष पुन्हा एक झाले तर त्यांच्या हातीच सत्ता जाण्याची शक्यता आहे. या दोन पक्षांची एकत्रित मते इंदिरा काँग्रेसपेक्षा जास्त आहेत. तेव्हा त्या दृष्टीने प्रयत्न होण्याचा संभव आहे.

लोकसभा – निवडणुकीतील अपयशाने विरोधीपक्ष काही धडा शिकले आहेत का ? लोकसभा–निवडणुकीनंतरच्या चार महिन्यात लोकदल व जनतापक्ष यांच्यात आणखी फाटाफूट झाली आहे. समझोता न करता आपले बळ अजमावून पहावे असे काही गटांना व त्यांच्या नेत्यांना वाटत आहे. त्यामुळे समझोता होण्यात अडचणी आहेत. समझोता होऊ शकला नाही तर त्याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळून केन्द्राप्रमाणे या नऊ राज्यातही ती सत्तेवर येईल, त्यातून एकाधिकारशाही प्रवृत्ती बळावेल. हा धोका टाळण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करायला हवेत ! □

## लोकसभा निवडणुका १९८०

### राजकीय पक्षांच्या जागा व मते

| राज्य | जागा | इं. काँग्रेस | | लोकदल | | जनता | | मार्क्सवादी | | कम्युनिस्ट | | अरस काँग्रेस | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जागा | शे. मते | जागा | शे. मते | जागा | शे. मते | जागा | शे. मते | जागा | शे. मते | जागा | शे.मते |
| १. बिहार | ५४ | ३० | ३६·४१ | ५ | १६·६० | ८ | २३·५७ | – | – | ४ | ७· ३ | ४ | ६·७३ |
| २. गुजरात | २६ | २५ | ५४·८४ | – | २·९० | १ | ३६·८९ | – | – | – | ०·२३ | – | १·७२ |
| ३. मध्यप्रदेश | ४० | ३५ | ४६·५२ | – | ७·८६ | ४ | ३१·७२ | – | – | – | – | – | १·२९ |
| ४. महाराष्ट्र | ४८ | ३९ | ५३·३० | – | १·०५ | ८ | २०·५८ | – | ३·५६ | – | ०–५० | १ | ११·६० |
| ५. ओरिसा | २१ | १९ | ५५ ६५ | १ | १९·५१ | – | १४·४३ | – | ०·९१ | – | ०·८२ | – | २·३७ |
| ६. राजस्थान | २५ | १८ | ४२·६६ | २ | १२·११ | ४ | ३०·४२ | – | ०·२३ | – | ०·५४ | १ | ५·९७ |
| ७. तामिळनाडू[1] | ३९ | २० | ३१·६२ | – | ०·५४ | – | ७·९६ | – | ३·२१ | – | ३·५९ | – | – |
| ८. उत्तरप्रदेश[2] | ८५ | ५१ | ३५·९० | २९ | २९·०२ | ३ | २२·५७ | – | – | १ | – | – | – |
| ९. पंजाब[3] | १३ | १२ | ५२·४५ | – | २·२१ | – | ९·९७ | – | २·७४ | – | – | – | – |

[1] द्रमुक १६ जागा, मते २३·०१. अण्णा द्रमुक २ जागा, मते २५·३८. मुस्लिम लीग १ जागा, मते १·४१.

[2] अरस काँग्रेस, कम्युनिस्ट व अपक्ष यांना मिळून १२·५१ टक्के मते मिळाली आणि जागा कम्युनिस्ट १ व अपक्ष १ याप्रमाणे मिळाल्या.

[3] अकाली दलास १ जागा व २३·३७ टक्के मते मिळाली.

# भाजप आणि जप यांचे पुण्यातील पहिले मेळावे

विजय कुवळेकर

दि. १३ एप्रिल १९८०! दुपारचे तीन वाजून गेले आणि पुण्यातलं 'सरस्वतीमंदिर' प्रशालेचं आवार गजबजायला लागलं. प्रशालेच्या प्रवेशद्वाराबाहेरच फलक होता 'भारतीय जनतापार्टी' 'कार्यकर्तासंमेलन' 'दुपारी ३ ते रात्री ८' अशी वेळ त्यावर दर्शविली होती. त्यासाठीच गर्दी जमायला लागली होती. 'पुणे शहर-जिल्हा भारतीय जनता पक्षा'च्या कार्यकर्त्यांचा हा मेळावा होता. 'भारतीय जनता पक्षा'ची स्थापना झाल्यानंतरचा पुण्यातला पहिलाच मेळावा म्हणून महत्त्वाचा.

चारच्या सुमाराला प्रत्यक्ष मेळाव्याचं काम सुरू झालं. येणारे कार्यकर्ते, बैठक-व्यवस्था, कार्यक्रमाची आखणी वगैरे बघितल्यावर प्रारंभीच त्यातली शिस्त लक्षात आली; पण त्यात 'कवायती' खाक्या नव्हता. राजकीय ढगळपणा होता; पण अगदी 'जत्रा'ही नव्हती. बरं वाटलं. दोन्ही अतिरेकी टोकं नसल्याचं तेवढंच समाधान!

'जयप्रकाशजींचं स्थान पूर्ण करण्यासाठी गांधीजींचं विकेंद्रीकरणाचं तत्त्व मानून पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या मार्गानं' भारतीय जनता पक्ष चालणार असल्याचं सांगितलं जातं. व्यासपीठावर त्याचं प्रातिनिधिक दर्शन या तिघांच्या तसबिरी घडवीत होत्या. व्यासपीठावर बरेच नेते-कार्यकर्ते बसले होते. बरीचशी मंडळी भूतपूर्व जनसंघाचीच असतील, असा अंदाज होता. ठरलेले चेहरेच तिथे तळपणार, असं वाटत होतं; पण एक सुखद धक्का बसला. 'जनसंघ' छावणीत न दिसणारे अनेक चेहरे तिथे होते. वेगळे चेहरे होते. आमदार उद्योगपती अतुर संगतानी, कामगारनेते आणि मोहन धारियांचे एक निकट सहकारी म्हणून प्रसिद्ध असलेले डॉ. प्रभाकर देशपांडे, समाजवादी पक्षाचे माजी नगरसेवक अॅड. म. वि. अकोलकर, पूर्वीचे कॉंग्रेसपक्षीय आणि शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ जनता पक्षाचे उपाध्यक्ष असलेले ताजअहंमद, पूर्वीचे समाजवादी पक्षीय आणि झोपडपट्टीवासियांचे एक प्रमुख नेते नगरसेवक मामा भोसेकर एवढी काही नावं सांगितली तरी पुरेशी व्हावीत. पुणे शहर-जिल्हा भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अण्णा जोशी, माजी आमदार डॉ. अरविंद लेले, नगरसेवक शिवाजीराव अढाव, मेळाव्याचे निमंत्रक नगरसेवक नारायणराव वैद्य, नगरसेवक विश्वास गांगुर्डे, नगरसेवक दत्तोपंत मेहेंदळे, कांचनभाई शहा, नानासाहेब पाषाणकर, नगरसेवक सुरेश नाशिककर, नगरसेविका शिक्षणमंडळप्रमुख मालतीबाई परांजपे, सुशीलाबाई आठवले, लीलाताई भावे वगैरे मंडळी होतीच.

'अंतरात अमुच्या स्मृती तुझीच जागु दे! चरण चालु दे सदा ध्येयमंदिराकडे' या गीतानं मेळाव्याचे कार्यक्रम सुरू झाले. 'दीपप्रज्वलन' वगैरे कार्यक्रम नंतर असेल, असं वाटलं. हे गीत संपल्यावर सामुदायिक 'वंदे मातरम्' झालं. 'भारतीय जनता पक्षाचं दिल्लीत स्थापनेपासून प्रारंभीच 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत म्हणण्याची प्रथा सुरू केली' असं त्या मेळाव्याला जाऊन आलेले पत्रकार बाळ भिडे म्हणाले.

आणि मग मेळाव्यातल्या भाषणादि कार्यक्रमांचा प्रारंभ झाला. मेळाव्याचे निमंत्रक नारायण वैद्य यांनी प्रास्ताविक केलं. 'विशिष्ट; परंतु चांगल्या वातावरणात हे संमेलन भरतं आहे,' असा प्रारंभ करून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रश्न कसा 'आभासी' होता आणि 'काही विशिष्ट गटांनी' हा प्रश्न 'आभासी' मानणाऱ्यांची हकालपट्टी करायचं ठरवूनच कसे प्रयत्न केले वगैरे सांगितलं. 'संघाचा प्रश्न 'आभासी' आहे, असं मानणारे केवळ पूर्वाश्रमीचे जनसंघीयच नाहीत, तर इतरही अनेक जण बाहेर पडले आहेत,' याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

एक चांगला मुद्दा त्यांनी मांडला. ते म्हणाले, 'संघाच्या प्रश्नावरचा वाद आता संपला आहे. या पक्षातही वादाचं ते कारण उरलेलं नाही आणि त्याही (मूळ जनता) पक्षात ते संपलं आहे. आता दोन्ही पक्ष कसोटीला लागणार आहेत. दलितांशी आमची बांधिलकी आहे की नाही? अल्पसंख्यांकांना आमच्या पक्षात स्थान आहे की नाही? आर्थिक दुर्बल घटकांसाठी पक्ष झटणार आहे की नाही? अशा प्रश्नांची उत्तरं त्यातून मिळणार आहेत.'

'दलितांशी बांधिलकी, अल्पसंख्यांकांना स्थान, आर्थिक पुनर्रचनेचा निर्धार आणि दुर्बल घटकांना सहाय्य करण्याची जबाबदारी या पक्षानं स्वीकारली आहे,' या त्यांच्या निवेदनाला श्रोत्यांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला, हे खरं; पण माझ्यासारख्यांना मात्र त्यातून पक्षाचा नेमका कार्यक्रम कळू शकला नाही. दलितांशी बांधलकी वगैरे नाकारणारा पक्षच मला अजून पहायला मिळालेला नाही. हा नवा पक्षही तीच भाषा वापरतो आहे, असं वाटलं.

एक गोष्ट मात्र खरी, की या भाषेला बाध येणार नाही, अशा काळजीनंच सगळा कार्यक्रम आखलेला दिसत होता. नारायणरावांच्या भाषणानंतर मेळाव्याचं औपचारिक उद्घाटन हडपसरचे एक जुने, दलित, सामाजिक कार्यकर्ते देवराम आवनावे यांचे हस्ते झाले. गांधीजी, जयप्रकाशजी आणि दीनदयाळजी यांच्या प्रतिमांना पुष्पहार

घालून त्यांनी हे उद्‌घाटन केलं. भाषण केलं नाही.

नंतर श्रद्धांजली–अर्पणाचा प्रस्ताव झाला. त्यात श्रद्धांजली अर्पिण्यास आलेल्यांच्या काही नावांचा उल्लेख पुरेसा आहे. शांता जोग, जयराम हर्डीकर आदी सात जण, 'नाना क्लास 'चे संस्थापक नाना आगाशे, माजी क्रिकेटकसोटीपंच आप्पासाहेब मोहोनी, पूर्वाश्रमीचे जनसंघकार्यकर्ते परशरामशेठ डाळवाले, तरुण क्रीडापटु अश्विन पुंडलीक, पूर्वाश्रमीचे समाजवादी कार्यकर्ते हरीभाऊ गद्रे, कै. केशवराव जेधे यांच्या पत्नी 'महाराष्ट्राची आई' श्रीमती वेणूताई जेधे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानोबा जाधव वगैरे दिवंगतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

जनता पक्षाचे एक तरुण कार्यकर्ते विश्वास गांगुर्डे यांनी नव्या पक्षाच्या स्थापनेचं स्वागत करणारा ठराव मांडला. नव्या पक्षाची स्थापना का आणि कशी करावी लागली, याचा थोडक्यात आढावा त्यांनी घेतला. ठरावातल्या मुद्द्यांचंच त्यांनी विवरण केलं. ते आक्रमक नव्हतं; पण प्रभाव पाडू शकणारं होतं. नव्या पक्षाच्या स्वागताचा ठराव अशा एका तरुणाद्वारे मांडण्यातही संयोजकांचं औचित्य दिसून येत होतं. गांगुर्डे दलितवर्गीय आहेत म्हणून नव्हे, तर तडफदार आणि तळमळीचे तरुण कार्यकर्ते आहेत म्हणून त्याला महत्त्व आहे. या दृष्टीनं त्यांनी हा ठराव मांडण्याला एक अर्थ आहे, असं वाटलं. पक्षाची तात्त्विक–वैचारिक बैठक मांडणाऱ्या या ठरावात म्हटलं आहे–

## बांधिलकी....

'स्वतःच्या स्वार्थाला तात्त्विक मुलामा देऊन जनता पक्षातील काही अविवेकी नेत्यांनी' 'दुहेरी निष्ठे 'चा निरर्थक वाद निर्माण केला आणि लक्षावधी प्रामाणिक कार्यकर्त्यांना त्या पक्षात स्वाभिमानाने काम करणे अशक्य केले. त्या वादामुळे जनता पक्ष 'निष्क्रियतेचा' बळी बनला आणि लोकनायक जयप्रकाशबाबूंचे समग्र क्रांतीचे स्वप्न साकार करण्याची शक्ती त्या पक्षात निर्माण होऊ शकली नाही.

'अशा स्थितीत, स्वर्गीय महात्माजी, स्व. पं. दीनदयाळ उपाध्याय आणि स्वर्गीय लोकनायक जयप्रकाशबाबू यांच्या स्वप्नांना आकार देण्यासाठी भारतीय जनता पक्षाची जी स्थापना करण्यात आली, त्या घटनेचे हे संमेलन सहर्ष स्वागत करीत आहे.

'महात्माजींच्या कल्पनेतील समाजवाद, सर्वधर्मसमभाव, लोकशाही, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा विकास (अंत्योदय) या ध्येयांशी ज्या पक्षाची बांधिलकी आहे त्या भारतीय जनता पक्षाची वाढ करून त्याला यशस्वी करण्यासाठी या संमेलनात सहभागी झालेले सर्वजण सतत प्रयत्नशील रहातील असा विश्वास हे संमेलन व्यक्त करीत आहे.'

ताज अहमद यांनी ठरावाला अनुमोदन दिलं. 'जनतापक्षाकडून जनतेच्या अपेक्षा होत्या त्या काही स्वार्थी नेत्यांनी नकली वाद काढून नष्ट केल्या. नवा पक्ष या अपेक्षापूर्तीसाठी झटेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'पक्ष फोडणारी मधू लिमये आदी मंडळी पूर्वजन्मी शिंपी जमातीची, कापाकापी करणारी असावीत', असं विधान भाजपचे नेते जगन्नाथराव जोशी यांनी शनिवारवाड्यावरच्या जाहीर सभेत केलं होतं. त्याला ताज अहमदनी उत्तर दिलं, 'खरा शिंपी कापतो ते जोडण्यासाठी. जोडणं हे त्याचं खरं काम असतं. मी शिंपी आहे. शिवतो ते टिकाऊ शिवतो. माझ्या शिलाईबद्दल मला बक्षीस मिळतं.'

ठरावाला अनुमोदन देणारं भाषण झालं डॉ. प्रभाकर देशपांडे यांचं. त्यांचं भाषण भावपूर्ण, आवेशपूर्ण आणि प्रभावी होतं. 'पुणे शहर–जिल्हा जनता पक्षाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभूत झाल्यामुळं ते भारतीय जनता पक्षात आले आहेत,' असं कुणी तरी पुटपुटलं. खरं–खोटं कुणास ठाऊक, पण भाषणावरून तसं वाटलं मात्र नाही. उलट आपण 'कधीच कुठल्याही पदाची हाव धरलेली नाही,' असं त्यांनी स्पष्ट केलं. राष्ट्रवादी शक्तीचं जोरदार समर्थन करताना त्यांनी समाजवादी मंडळींचा प्रत्यक्ष उल्लेख न करता एक चिंतनीय विचार मांडला. त्याचा रोख प्रामुख्यानं समाजवादी मंडळींवर होता. असं असलं तरी एकूण राजकारणाच्या संदर्भातच तो महत्त्वाचा ठरावा. ते म्हणाले, 'भारतीय राजकारणात एक वेगळं चातुर्वर्ण्य येतं आहे. नवा ब्राह्मण्यवाद निर्माण होतो आहे. 'आम्ही सांगू तेच खरं, तुम्ही फक्त ऐका!', असं म्हणणारा ब्राह्मणवर्ग पूर्वीच्या काळात होता. असा नवा राजकीय 'सिद्धान्त–स्वामीं'चा वर्ग आता उदयाला आला आहे. 'आम्ही सांगू तोच समादवाद; सामाजिक–आर्थिक विचारांचे धनी आम्ही. विचारांचं स्वामित्व आमच्याकडे आहे आणि म्हणून पक्षावरही आमचंच स्वामित्व हवं,' असा या सिद्धान्तस्वामींचा दावा असतो. हे नवे राजकीय ब्राह्मण आहेत, नवी राजकीय अस्पृश्यता ते निर्माण करीत आहेत. ही राजकीय अस्पृश्यता घातक आहे.'

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करणाऱ्यांची तात्त्विकता भोंगळपणाची आहे' अशा आशयाचं विवेचन करून ते म्हणाले, 'देशावर प्रेम करणारी संघटना कुठली का असेना, ती या देशाचं खड्ग असतं, सामर्थ्य असतं. त्यांच्या निष्ठांबद्दल सवाल करणाऱ्यांना रशियन राजकीय वर्चस्व चालतं? मधू लिमये, बहुगुणा यांच्या निष्ठा काय आहेत, हे कुणी विचारलं का नाही?' 'माझ्यासारखा 'गावीचे ते लेंडावळ' असलेला कार्यकर्ता या गंगेत येऊन पावन झाला आहे. मी योग्य त्याच बाजूला (पक्षात) आलो आहे. आता मी तो कधीच सोडणार नाही!' असा निर्वाळा त्यांनी दिला.

त्यांच्या पाठोपाठ पूर्वाश्रमीचे जनसंघाचे एक 'पडद्यामागचे सूत्रधार' असलेले डॉ. अरविंद लेले यांनी भाजपच्या भूमिकेबद्दल निवेदन केलं. 'निवडणूक हा या पक्षाचा आत्मा नाही. मागचा जनता पक्ष हा निवडणुकीमागोमाग निवडणुका लढविणारी एक मोठी निवडणूकयंत्रणा असाच झाला होता. तसं या नव्या पक्षाचं स्वरूप नाही. व्यापक सामाजिक-आर्थिक बांधणीचं त्याचं उद्दिष्ट आहे' असं त्यांनी सांगितलं.

नंतर नव्या पक्षाच्या वाटचालीतली 'प्रगतीची चिन्हं' ठरणाऱ्या काही घटना सांगण्यात आल्या. भाजपच्या स्थापनेनंतर अवघ्या तीनच दिवसांनी जम्मूच्या नगरपरिषदेत भाजप पूर्ण बहुमतात आला आहे, नगरसेवक काका वडके यांनी भाजपला पाठिंबा कळविल्यामुळे पुणे महापालिकेत भाजपचा गट बारा सदस्यांचा झाला आहे, पूर्वी कोणत्याही पक्षात नसलेल्या वयोवृद्ध सामाजिक कार्यकर्त्या श्रीमता

कृष्णाबाई निंबकर वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी अपक्षत्व सोडून भाजपच्या प्राथमिक सभासद झाल्या आहेत, पुणे कॅन्टोन्मेंट जनता पक्षाचे अध्यक्ष अॅड. ए. रहमान यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे, डॅनिएल व्ही. गायकवाड भाजपमध्ये आले आहेत, अशी माहिती त्यात अण्णा जोशींनी दिली. कार्यकर्त्यांनी त्याचं स्वागत केलं.

पक्षस्थापनेच्या स्वागतापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाचं स्थान आसाम-विषयक ठरावाला दिलं होतं. यावरून भाजपच्या धोरणात-कार्य-क्रमात या प्रश्नाला अत्यंत महत्त्वाचं स्थान द्यायचा निर्णय केंद्रीय नेतृत्वानं घेतला असला पाहिजे, असं वाटतं. महापालिकेतले भाजप गटाचे नेते शिवाजीराव आढाव यांनी हा ठराव मांडला; पण त्यांना तो प्रभावीपणे मांडता आला नाही. बंगाली आणि बांगला देशीय यांच्यात ते गल्लत करीत होते. ' घूसखोर मुसलमानांना पश्चिम बंगाल देशात परत पाठवलं पाहिजे ' किंवा ' घुसलेल्या बंगाल्यांना बांगला देशात परत पाठवणं आवश्यक आहे ' अशासारखी विधानं त्यांनी केली. ' एक अभ्यासू आणि चांगला तळमळीचा कार्यकर्ता ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आढावांनी अशा चुका टाळायला हव्या होत्या. आसामसारखा महत्त्वाचा प्रश्न मांडताना असा गोंधळ होणं योग्य वाटलं नाही. तसंच पक्षाचं धोरण लक्षात घेतलं तर त्यांचा रोख ' घूसखोरांवर ' असायला हवा होता, ' मुसलमानांवर ' नको होता. (मूळ ठरावातही घूसखोरांवरच रोख आहे.)

मूळ ठरावात म्हटलं आहे, ' परकीय घुसखोर नागरिकांचे वाढते उपद्रव व त्यांच्या राष्ट्रविरोधी कारवाया याविरुद्ध आसाम राज्यात गेले चार महिने एक अपूर्व जनआंदोलन, अतिशय शांततापूर्ण मार्गाने चालू आहे. देशभक्तीने प्रेरित झालेल्या त्या आंदोलनाला हे संमेलन पाठिंबा देत आहे. सदर आंदोलनात आसाममधील असंख्य विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले असताना, एका व्यापक जनसमर्थनाच्या पायावर ते आंदोलन वाढत असताना, पंतप्रधान काही संघटनांच्या नावे त्या आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचप्रमाणे बंगालमध्ये आपल्या पक्षाच्या वतीने यादवी निर्माण करायला चिथावणी देऊन आणि आसाम राज्य ' अशांत प्रदेश ' घोषित करून पंतप्रधान लष्करी बळाने ते आंदोलन चिरडू पाहात आहेत. त्या आंदोलनामागील राष्ट्रीय प्रश्न हेतुतः डावलून, त्याला राजकीय स्वरूप देण्याच्या आणि लोकशाहीविरोधी मार्गांनी ते आंदोलन दडपून टाकण्याच्या हुकूमशाही वृत्तीचा हे संमेलन तीव्र निषेध करीत आहे. '

यानंतर, स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला पाठिंबा देणारं विधान केल्याबद्दल माहिती व नभोवाणीमंत्री वसंत साठे यांचा निषेध करणारा ठराव झाला.

केंद्र सरकारनं झोपडपट्ट्यांतील नागरिकांच्या रक्षणासाठी काढलेल्या वटहुकुमात पुणे महानगराचा समावेश करून विकासाची कामं सुरू करण्याची मागणी करणारा ठराव सुरेश नाशिककर यांनी मांडला. झोपडपट्टीत राहणारे कार्यकर्ते प्रल्हाद कांबळे यांनी त्याला अनुमोदन दिलं. ' आता पावसाळा येईल. गुडघा गुडघा चिखल होतो आणि त्यात न्हायला लागतं बगा साहेब ' अशी त्यांची दोन-चार वाक्यंच थरथरवून गेली. नसीम शेख आणि कंजारभाट समाजातला तरुण कार्यकर्ता कुमार राऊळकर यांनीही वेदना अशाच बोलून दाखविल्या. झोपडपट्टीसंघाचे उपाध्यक्ष मामा भोलेकर यांनी मात्र ही दुःखं मांडून त्यासाठी सेवा-कार्याची गरज प्रतिपादन करताना हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन-वाद आणला. ' हिंदूंनी ख्रिश्चनांसारखे मिशनरी तयार केले पाहिजेत ' आणि ' मुस्लिमांना हटवून हिंदू धर्म टिकविला पाहिजे ', हे सूत्र ते सतत मांडत होते. झोपडपट्टीच्या प्रश्नाच्या संदर्भात आणि पक्षाच्या एकूण कार्याच्या दृष्टीनंही हे सूत्र औचित्याला सोडून वाटलं. मात्र ' झोपडपट्टीत सेवाकार्य सुरू करणं आवश्यक आहे ', हा त्यांचा मुद्दा महत्त्वाचा होता. भाजपचं झोपडपट्टी विभागाचं कार्य तेच सांभाळणार असल्याचं या वेळी सांगण्यात आलं. तसं झाल्यास हे सेवाकार्य ते सुरू करू शकतील, असं मानायला हरकत नाही.

शेवटी नेहमीच्या महागाईचा निषेध वगैरे करणारा आणि ' सरकारला इशारा ' देणारा ठराव झाला. प्रामुख्यानं महिलांनी तो मांडला. सर्व अनुमोदकांच्या वतीनं अॅड. म. वि. अकोलकर यांनी त्याचं प्रभावी संकलन केलं.

## तरुण चेहरा

मेळाव्याचा पूर्वार्ध इथे संपला. यानंतर अर्धा तास चहापानासाठी होता आणि नंतर खुलं अधिवेशन होतं. महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस प्रमोद महाजन प्रमुख पाहुणे होते. पस्तिशीतला तरुण नेता मेळाव्याचा प्रमुख पाहुणा आहे, ही बाबही दिलासा देणारी होती.

खुल्या अधिवेशनात अध्यक्ष अण्णा जोशी आणि प्रमुख पाहुणे प्रमोद महाजन यांची भाषणं झाली. पूर्वार्धातल्या वक्त्यांपेक्षा वेगळं काही त्यांनी सांगितलं नाही. अण्णांचं भाषण आवेशपूर्ण होतं. महाजनांचं भाषण ढंगदार वक्तृत्वातलं आणि आक्रमक होतं.

खुल्या अधिवेशनाच्या समारोपाबरोबरच भाजपचा पुण्यातला हा पहिला मेळावा संपला. मेळावा सुरू झाला तेव्हा 'सरस्वती मंदिर'च्या सभागृहात चार-पाचशे मंडळी होती. त्यात शंभराच्या आसपास महिला होत्या. अर्ध्या-पाऊण तासात गर्दी वाढत जाऊन बाहेरच्या प्रांगणात सतरंज्या टाकाव्या लागल्या होत्या. जवळजवळ हजाराच्या पुढे कार्यकर्त्यांची संख्या गेली होती, म्हणून खुलं अधिवेशन प्रांगणातच घ्यायचं ठरलं.

एकूण जमाव बरा होता. ' अल्पकाळाच्या तयारीस ' हा बराच चांगला प्रतिसाद आहे, असं संयोजकांचं म्हणणं दिसलं. कार्यकर्त्यांत तरुणांचं प्रमाणही लक्षणीय होतं. त्यामानानं महिलावर्गात मात्र तरुणींचं प्रमाण कमी होतं. कार्यकर्त्यावर्गाचा सर्वसाधारण तोंडवळा मात्र मध्यमवर्गीय, काहीसा ब्राह्मणी असाच होता. व्यासपीठावरच्या आणि वक्त्यांच्या विविधतेचं प्रतिबिंब श्रोतृवर्गात फारसं दिसत नव्हतं. हा तोंडवळा बदलण्याची इच्छा व्यासपीठावर विविध स्तरांना आणि त्यातही तरुणांना असलेल्या विशेष प्रतिनिधित्वातून व्यक्त होत होती, असं मानायला हरकत नाही. सर्व ठराव एकमतानं झाले; पण काही उपसूचना आल्या होत्या, त्यांचा विचारही झाला. प्रारंभापासून संपूर्ण मेळावा पत्रकारांना खुला होता, हेही या पक्षाबद्दल केल्या जाणाऱ्या टीकेच्या संदर्भात उल्लेखनीय होतं. एकूण

पृष्ठ २० वर

**डोंबिवली परिसरात झपाट्याने उभी राहिलेली ही नगरी म्हणजे अलीबाबाची गुहाच आहे. अनेक तेजस्वी रत्ने या गुहेत आपल्याला दिसतील; पण सरकारी लाल फीत व लाचखोरी, दिरंगाई यामुळे ही रत्ने आता काळवंडू लागलेली आहेत.**

**गोवा, गुजराथ, कर्नाटक ही राज्ये या कर्तबगार तरुण उद्योजकांचे स्वागत करायला उत्सुक आहेत.**

**होऊ द्यायचे का हे स्थलांतर?**

# डोंबिवली क्षेत्रातील छोटे उद्योजक व त्यांचे प्रश्न

प्रा. चंद्रशेखर राजे

'साहुकार (व्यापारी) म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा' असे म्हणणारे आज्ञापत्रकार आज असते तर त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना सांगितले असते की, 'छोटे उद्योजक म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा'. डॉ. बाबा आमटे यांनी 'यूथ इज ही हू कॅरीज यंग हेड ऑन यंग शोल्डर्स' असे ज्या तरुणाईचे वर्णन केले आहे ती तरुणाई जेथे प्रत्यक्षात पहावयास मिळते त्या परिसराचे नाव असते 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ'. आपण आपल्या पाहणीसाठी एखादे क्षेत्र (महाराष्ट्रातले) घेतले तरी त्या क्षेत्रावरून, तेथील लघुउद्योजकांवरून स्थूलमानाने महाराष्ट्रातील लघुउद्योजकांच्या समस्या व त्यांचे प्रश्न आपल्या लक्षात येतील. 'जे सागरात तेच घागरीत' ह्या म्हणीनुसार मी निवडले आहे 'डोंबिवली क्षेत्र'. या क्षेत्रातील लघुउद्योजकांची पाहणी केल्यानंतर मला जे आढळले त्याची ही नोंद आहे. मधल्या काळात अर्थात काही प्रश्न मार्गी लागले असतील, काही सुटले असतील किंवा काही नव्याने निर्माण झाले असतील.

ह्या विभागात प्रवेश करण्यापूर्वी ह्या विभागाची थोडीफार माहिती करून घेऊ या. डोंबिवली स्टेशनवरून पूर्वेकडे टिळकनगरमार्गे गेले म्हणजे ह्या क्षेत्राचा पहिला टप्पा (फेज नं. १) दिसतो, तर दुसरा टप्पा रामवाडीनंतर प्रिमियर ऑटोमोबाइलसपर्यंत लागतो. तिसरा टप्पा शिळफाट्याकडे आकाराला येत आहे; पण त्याला आकार येण्यास थोडा अवधी लागेल. खऱ्या अर्थी छोटे उद्योजक व त्यांचे छोटे छोटे कारखाने जर पहावयाचे असतील तर ह्या फेज नं. २ चाच विचार करावा लागेल. तिकडेच फेरफटका मारला पाहिजे. फेज नं. १ हा विभागसुद्धा छोट्या उद्योजकांचाच आहे; पण हे छोटे उद्योजक आहेत सरकारी व्याख्येप्रमाणे. त्यांचा व्याप व गुंतवणूक मोठी आहे. ह्या विभागात सारेच तसे आहेत असे नाही; पण फेज नं. २ मध्ये खऱ्या अर्थी लघुउद्योजक आहेत. आपण ह्या साऱ्यांचा साकल्याने आणि काही जणांचा तपशीलवार विचार केला पाहिजे.

ह्या उद्योनगरीत अभियांत्रिकी (इंजिनियरिंग) व रसायनांचे कारखाने प्रामुख्याने आहेत. त्यानंतर प्रक्रिया करणारे कारखाने लक्ष वेधून घेतात. त्याशिवाय डिटर्जंट पावडर, प्लॅस्टिकच्या वस्तू बनविणारे, चष्म्याच्या फ्रेम्स, घरांना सुशोभित करणाऱ्या लाद्यांचे कारखाने इ. विविध नित्योपयोगी वस्तू बनविणारे कारखाने ह्या विभागात आहेत. ह्या संपूर्ण नगरीत अंदाजे ३५० लहानमोठे कारखाने आहेत. त्यापैकी सुमारे २५० कारखाने छोट्या उद्योजकांचे आहेत. सुशिक्षित बेकारांसाठी महाराष्ट्र (केन्द्रही) सरकारने ज्या विविध सवलती देऊ केल्या आहेत त्यांचा लाभ घेऊन स्वतंत्रपणे व्यवसाय करण्याचा उद्देश नजरेसमोर ठेवून, नवे काही तरी निर्माण करण्याची जिद्द मनात धरून नोकरी न करता वा असलेली नोकरी सोडून स्वयंरोजगार निर्माण करणारे उद्योजक ह्या नगरीत आहेत. मला अभिप्रेत (विशेषतः) आहेत ते छोटे उद्योजक हेच आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने डोंबिवली येथील ही जागा अंदाजे सोळा वर्षांपूर्वी औद्योगिक क्षेत्रासाठी घेतली. प्रथम दोन हजार चौरस वारांचे एक क्षेत्र (युनिट) निर्माण केले; पण एव्हढी मोठी जागा खरेदी करून तेथे कारखाना उभारणे आर्थिकदृष्ट्या शक्य होणार नाही असे अनेकांनी सांगितल्यामुळे एक हजार

चौरस वारांचे एक क्षेत्र निर्माण केले. प्रतिमा कास्टिंग्जचे श्री. वामनराव साठे यांनी इतर उद्योजकांच्या मदतीने ही लहान क्षेत्राची कल्पना अंमलात आणावयाची सूचना केली. एक रुपया चौरस वार या दराने खरेदी केलेली ही जागा (जमीन) आज सुमारे शंभर रुपये चौरस वार भावाने महामंडळ उद्योजकांना विकते. डोंबिवली नगरपालिकेच्या हद्दीपासून दूर असणारी ही नगरी अनेक बाबतीत स्वयंपूर्ण आहे. हा सारा खर्च महामंडळाने केला आहे. ह्या नगरीत आज चांगले रस्ते आहेत, पाण्याचा तुटवडा येथे भासत नाही. एक नमुनेदार उद्योगनगरी करण्याचा निर्धार दिसतो; पण काही त्रुटी आहेत. बँक, पोस्ट ऑफिस, टेलिफोनकेन्द्र, मनोरंजनकेन्द्र, हॉटेल्स, एस्. टी. स्टँण्ड, रिक्षातळ इ. विविध सोयी कोठे कशा असाव्यात ह्याचे नियोजन नसावे अशी परिस्थिती दिसते. त्यामुळे या नगरीतील साऱ्यांनाच अनेक गैरसोयी सोसाव्या लागतात. या नगरीतील उद्योजक केवळ आपल्या उद्योगाचाच विचार करीत नाहीत तर ही सारी वसाहतच कशी नमुनेदार होईल ह्याच्याही योजना त्यांच्याजवळ आहेत. या योजनांचा फायदा महाराष्ट्रातील इतर ठिकाणी असणाऱ्या उद्योगनगरींनाही होईल यात शंकाच नाही.

### वायुप्रदूषणाचे परिणाम

रासायनिक कारखान्यांचा कोणता परिणाम ह्या परिसरावर होईल याची पूर्वकल्पना नव्हती वा कल्पना असूनही दुर्लक्ष झाले असावे. त्यामुळे फार मोठा परिणाम ह्या परिसरावर झाला. जलप्रदूषण व वायुप्रदूषण झाले. उघड्या असणाऱ्या टेलिफोनच्या व विजेच्या तारा तुटून खाली पडल्या. पडता पडता माणसांच्या व जनावरांच्या अंगावर पडल्या. त्यामुळे अनेक माणसे व जनावरे दगावली व जखमी झाली. उत्पादनात खंड पडला, व्यत्यय आला. असा अनेक प्रकारे उपद्रव होऊ लागला व होत आहे. त्याच वेळेस जर ह्या तारा जमिनीखालून आणल्या असत्या (underground) तर उपद्रव, अपघात, नुकसान इ. प्रकार तर टळले असतेच; पण आता जर ही योजना (underground wiring) अमलात आणण्याचे ठरविले तर येणारा खर्च फार अफाट असेल इतकी ह्या केबल्सची भाववाढ झाली आहे. योग्य नियोजन (Planning) नसले म्हणजे काय होते याचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. सुरुवातीलाच उद्योजकांकडून थोडा अधिक खर्च (पैसा) घेतला असता तर कोणीही फारशी खळखळ केली नसती. आज व्यवसाय, उत्पादन चालू झाल्यानंतर हा पैसा देणे उद्योजकांना केवळ अशक्य आहे. सरकारने जलप्रदूषणप्रतिबंधक कायदा केला आहे; पण वायुप्रदूषणाचा विचारही केलेला नाही. वायुप्रदूषण प्रतिबंधक कायदा करणे किती आवश्यक आहे हे ह्या परिसरात गेल्यावर कळते. सरकार वायुप्रदूषणाचा प्रश्न गंभीरपणे मनावर घेत नाही; मग ध्वनिप्रदूषणाचा विचार केव्हा करेल ? हा एक साठ लाख डॉलर्सचा प्रश्न आहे.

वायुप्रदूषणाचा ह्या परिसरावर किती भयानक परिणाम होत आहे हे पहावयाचे असेल तर 'व्हर्सटाइल इंजिनियर्स' ह्या कारखान्याचा अनुभव पाहू या. त्या वेळी ह्या उद्योगाचे भागीदार असणारे श्री.वसंतराव धामणकर म्हणाले, 'आमच्या ह्या कारखान्याच्या (टप्पा क्र. १) बाजूला एक केमिकल्सचा कारखाना आहे. त्या कारखान्यातून येणाऱ्या दूषित वायूमुळे आमच्या कारखान्याचे लोखंडी शटर्स पापुद्रे पापुद्रे होऊन, भुगा होऊन खाली पडले. 'एक लोखंडी शटर्स घमेल्यात भरावे लागले.' आम्ही आता ह्या ठिकाणी भिंतच बांधली आहे. आम्ही ह्या परिसरातले सारेजण गमतीने म्हणतो की, 'आम्ही केव्हा मरणार हे सांगू शकणार नाही; परंतु कशाने मरणार हे आता निश्चित झाले आहे !' ह्या परिसरात बागा लावता येत नाहीत, झाडे जगत नाहीत. उघड्यावर टाकलेल्या लोखंडाच्या वस्तू गंजून निकामी होतात. श्री. वामनराव साठे यांच्या 'प्रतिमा कास्टिंग्ज' ह्या कारखान्यात प्रवेश केल्याबरोबर प्रथम नजरेत भरतात ते तेथील भव्य पुतळे ! त्या धातूच्या पुतळ्यांवर ह्या प्रदूषणाचा जबरदस्त परिणाम झालेला दिसून येतो. 'ज्याने मागणी केलेली असते त्या व्यक्तीला वा संस्थेला पुतळा पाठविण्याअगोदर अनेक वेळा त्याची साफसफाई करावी लागते. नाही तर तो कित्येक वर्षांपूर्वी बनविला असावा असे वाटण्याइतपत खराब होतो. जर ही अवस्था लोखंड व ब्राँझसारख्या धातूची होते तर मानवी शरीरावर त्याचा कोणता भयानक परिणाम होत असेल ह्याची कल्पना येऊ शकेल. या संदर्भातील एक अनुभव सांगण्यासारखा आहे. आज भिवंडी येथील भिवंडी कॉलेजात रसायनशास्त्राचे प्राध्यापक असणाऱ्या प्रा. अरुण गाडगीळ यांचाच हा अनुभव आहे. ते म्हणाले, 'मी कल्याणपरिसरातील एका कारखान्यात नोकरीला होतो. पावसाळा संपल्यामुळे छत्री कारखान्यातच राहिली. पुढील पावसाळामोसम सुरू होण्याअगोदर दुरुस्ती, साफसफाईसाठी घरी न्यावी म्हणून ती छत्री उघडून पाहिली. त्या छत्रीच्या कापडाची अक्षरशः चाळण झाली होती ! काही महिन्यात कापडाची चाळण होते; मग काही वर्षांत आपले काय होईल ? या कल्पनेनेच अंगावर शहारे आले आणि लगेच ती नोकरी सोडून घरी बसणे पत्करले !'

कारखान्यातून बाहेर पडणारे सारे पाणी ड्रेनेजद्वारे एका ठिकाणी गोळा करून त्यावर जर प्रक्रिया केली आणि ते जर बाहेर सोडले तरच येथील वनस्पती वाचू शकतील. ही योजना (ड्रेनेजची) आस्ते आस्ते आकाराला येते आहे...ही योजना (प्रक्रियेची) महामंडळाने करावी. कारण त्यासाठी येणारा खर्च एकट्या दुकट्या उद्योजकाला परवडणारा नाही. जलप्रदूषण अशा प्रकारे टाळता येईल; पण वायुप्रदूषणाचे काय? सरकार तर त्याचा विचारही करीत नाही. सरकारने त्वरित वायुप्रदूषण व ध्वनिप्रदूषण-प्रतिबंधक कायदे करून त्यांची कडक अंमलबजावणी करावी तरच अशा 'तऱ्हेची औद्योगिक क्षेत्रे तेथे काम करणाऱ्यांना व तेथील नागरिकांना सुखावह होतील. नाही तर नकोत ही औद्योगिककेंद्रे असेच साऱ्यांना वाटेल आणि हे वाटणे औद्योगिक प्रगतीला विघातक ठरेल.

ह्या (अशा तऱ्हेच्या) वसाहतीला पाण्याचा, विजेचा प्रश्न जरी भेडसावत नसला तरी वीजमंडळाच्या नमुनेदार कारभाराचे चटके मात्र सहन करावे लागतात. अचानक वीज जाणे किंवा विजेच्या दाबात चढउतार होणे हे नियमितपणे चालते. नियमितपणे अनियमित वीजपुरवठा व दाब याचा परिणाम उत्पादनावर, गुणवत्तेवर व एकूण साऱ्या व्यवहारांवर होतो. एका उद्योजकाने सांगितले की, 'माझा कारखाना सिमेंटवरच अवलंबून आहे. जर माल (सिमेंट, वाळू इ.) मशिनमध्ये टाकला आणि अचानक वीज खंडित झाली

किंवा दाब कमी झाला तर तयार केलेला माल फुकट जातो. तो माल मला कवडीमोलाने विकावा लागतो किंवा कचऱ्याच्या पेटीत टाकावा लागतो. ह्याचा परिणाम म्हणजे कामगारांचे पैसे द्यावे लागतात, मालाचे नुकसान होते आणि वेळेवर माल पुरवू न शकल्यानुळे गिऱ्हाईक नाराज होते, असा अनेक प्रकारे तोटा सहन करावा लागतो. केवळ वीजमंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे यंत्राच्या क्षमतेवर होणारा परिणाम तर आमच्या मुळावरच आघात करतो !

औद्योगिक नगरीतील उद्योजकांना त्यांच्या गिऱ्हाइकांशी, कच्चा माल पुरवणाऱ्यांशी संपर्क ठेवावा लागतो. हा संपर्क साधला जातो टेलिफोनद्वारे. आजच्या जमान्यात फोनचा फायदा किती हे सांगावे लागू नये; पण टेलिफोनची व्यवस्था कशी असू नये याचा नमुना पहावयाचा असेल तर त्या परिसरात या ! या विषयावर अनेक वर्षे अनेक नियतकालिकांतून लिहिले जात आहे. टेलिफोन हा एक डोकेदुखीचा विषय आहे. त्याचा त्रास आणि जाच सर्वांनाच सर्व ठिकाणी होत आहे. त्यामुळे त्यावर अधिक काही लिहिणे आवश्यक आहे असे वाटत नाही; पण एक मात्र सांगावेसे वाटते की, गतीचा कायदा पाळण्यासाठी फोन हवाच; नाही तर फायद्याची, विकासाची गतीच खंडित होईल.

## किमान सुखसोयी असाव्यात

एस्. टी. डेपो, रिक्षातळ, कामगारांसाठी स्वस्त भाड्याची घरे, पोस्ट, बँक इ. अनेक सोयींची आवश्यकता आहे. या साऱ्या सोयी कशा आहेत यावर लिहावे तेवढे थोडेच आहे. उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या या साऱ्या सोयी कार्यक्षम, गतिशील, योग्य ठिकाणी आणि स्वस्त असणे आवश्यक असते; पण ही वसाहत (आणि इतरत्रही) निर्माण करताना या साऱ्यांचा विचारच झाला नसावा असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे.

सध्या हॉटेलसचेच उदाहरण घ्या ना. शेकडो कामगार काम करीत असणाऱ्या ह्या नगरीत चांगली, स्वच्छ आणि मोक्याच्या ठिकाणी हॉटेल्स नाहीत. मोक्याच्या ठिकाणी हॉटेल्स सुरू होण्याकडे महामंडळाने लक्ष दिले पाहिजे. श्री. अण्णा उल्लेंगल (एक उद्योजक, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ते) म्हणाले की, ह्या परिसरात केवळ अशाच हॉटेलसची गरज नाही तर बाहेरून येणाऱ्यांसाठी निवासाची सोय असणारी हॉटेलसही हवीत. अगदी थ्रीस्टारवालीच असली पाहिजेत असे नाही, तर बऱ्यापैकी निवासाची व भोजनाची सोय असणारी हवीत. अशी हॉटेल्स ही या वसाहतीची अगदी तातडीची गरज आहे.

वाहतूक ही एक समस्याच आहे या परिसराची. एस्. टी., रिक्षा, सायकली, स्कूटर्स, कार्स ही वाहने जवळजवळ चोवीस तास धावत असतात या विभागातून; पण साऱ्यांना परवडेल असे वाहन म्हणजे एस्. टी; पण ही बस आपल्याच मार्गाने, आपल्याच तालात, ताऱ्यात व आपल्याच मर्जीनुसार धावते. जेथे रस्ता तेथे बस ही जर भूमिका असेल तर कवळ एकाच मोठ्या रस्त्याने का धावतात ह्या बसेस ? टप्पा क्र. १ व टप्पा क्र. २ यांच्यातून जाणारी, चक्राकार जाणारी अशी बससेवा का असू नये ? बसथांब्यावरून आपल्या कारखान्याकडे, शेडकडे जाण्यासाठी प्रत्येकालाच खूप पायपीट करावी लागते. ती टाळावी यासाठी योग्य ती सोय झाली पाहिजे. ह्या परिसरातील गुंडगिरी आणि त्यामुळे खंडित होणारी बससेवा हा एक स्वतंत्रच विषय आहे. रिक्षांचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत. रिक्षा हे वाहन रोज प्रवास करणाऱ्यांसाठी न परवडणारे वाहन आहे. यासाठी एस्. टी. महामंडळाने आपले अधिकारी पाठवून या विभागासाठी चांगली, जलद व सोयिस्कर अशी वाहतूक कशी करता येईल याची योजना 'कामा' (कल्याण–अंबरनाथ मॅन्यु. असोसिएशन) व टेक्नोक्रॅटस् असोसिएशन (लघुउद्योजकांची संघटना) यांसारख्या संघटनांशी विचारविनिमय करून आखली पाहिजे.

लघुउद्योजकांपैकी काही जणांजवळ स्कूटर्स आहेत. स्कूटर हे वाहन बहुविध उपयोगासाठी वापरले जाते. चटकन कोठेही जाण्यासाठी, गिऱ्हाइकांना भेटण्यासाठी, तयार झालेला थोडासा माल पोहोचविण्यासाठी, कच्चा माल आणण्यासाठी इ. स्कूटर हे या लघुउद्योजकांच्या व्यवसायाचे प्रतीकच मानावे लागेल. छोटे, आटोपशीर, स्वस्त, गतिमान, देखणे आणि विविध उपयोगी असे हे वाहन सर्वांना सहज उपलब्ध व्हावे अशी योजना आखता येणार नाही का ? हे उद्योजक पद्मिनीमधून किंवा इम्पालामधून फिरण्याचे स्वप्न पहात नाहीत (नसावेत); पण त्यांचा स्वयंरोजगाराचा, नवनिर्मितीचा व्यवसाय नीट चालावा यासाठी विचारपूर्वक कोण योजना आखणार हा खरा प्रश्न आहे.

या अडचणींशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट श्री. वामनराव साठे यांनी सांगितली. ते म्हणाले की, अशा उद्योगनगरीला विविध लहानसहान गोष्टींची गरज भासते. उदाहरणार्थ खिळे, नळदुरुस्ती, वायरिंग, रंगारी, सुतार. या साऱ्यांची गरज केव्हा ना केव्हा लागतेच. कधी कधी रुपया–दोन रुपयांची वस्तू (खिळे) आणण्यासाठी कल्याण किंवा डोंबिवलीला जावे लागते. त्यात वेळ जातो, खर्च होतो आणि उत्पादनात खोळंबा होतो. त्यासाठी उपाय म्हणून या वसाहतीत मध्यभागी एक मोठी इमारत बांधून त्या इमारतीत लहान लहान व्यापाऱ्यांना लहान लहान गाळे (खोल्या) द्यावेत. ज्याला Industrial Estate म्हणतात त्या प्रकारची सोय व्हावी. असा छोट्या प्रमाणावर व्यवसाय करणारा व्यापारी इथली शेड घेऊ शकणार नाही. त्यासाठी महामंडळाने ही सोय करावी. या उद्योगनगरीत काय काय निर्माण होते व त्यांना काय काय हवे असते याची यादी करून त्याप्रमाणे व्यवस्था झाली पाहिजे. इथले उद्योजक म्हणजे कोणी शोषण करणारे, काळा बाजार करणारे, नाडणारे भांडवलदार, उद्योगपती, व्यापारी, आहेत असे न मानता ह्या देशाचा, परिसराचा कायापालट करणारे भगीरथ आहेत हे ध्यानात घेऊन त्यांच्यासाठी सर्व संबंधितांनी आपल्याला जे जे शक्य आहे, जे जे आपल्याला करावयास सांगितले (नेमले) आहे ते ते प्रामाणिकपणे केले तर बुद्धिमान, प्रतिभावान आणि कष्टाळू मंडळी या देशाचे नंदनवन करतील; पण ! हा पणच मोठा त्रासदायक आहे !

या उद्योजकांशी बोलताना, त्यांच्या मनोची शल्यशल्ये माहीत करून घेताना अनेक गोष्टी कळल्या. ही शल्ये केवळ याच विभागातील उद्योजकांची आहेत असे अजिबात नाही. भ्रष्टाचार हा येथल्या सरकारी आणि निमसरकारी संस्थांचा शिष्टाचार झाला आहे.

भ्रष्टाचाराचा हा ऑक्टोपस त्यांचे (पर्यायाने साऱ्या समाजाचे) शोषण करीत आहे. प्रत्येकाने लाचलुचपतीवर कडाडून हल्ला केला. दिरंगाई, लालफीत, लाचखोरी यांच्या हल्ल्याला तोंड देता देता नाकी नऊ आलेले हे उद्योजक या विषयावर पोटतिडिकेने बोलले; पण त्यांची विधाने नावनिशीवार छापू का? असे विचारले असता प्रत्येकजण म्हणाला, 'आम्हाला काय जीवनातून उठवून लावण्याचा विचार आहे काय तुमचा?' या देशाने फक्त अठरा महिनेच आणीबाणी, मुस्कटदाबी अनुभवली; पण हे सारे उद्योजक सदैव आणीबाणीच्या वातावरणातच वावरताहेत! काम व्हावे, वेळेवर व्हावे, नीट, चांगले व्हावे असे वाटत असेल तर संबंधितांना (खात्यातील लोकांना) पैसे द्यावेच लागतात. त्याशिवाय कोणताच कागद हलत नाही. ज्यांनी हा देश, हा समाज सुखी, संपन्न व्हावा म्हणून स्वतःचे कौशल्य, बुद्धी पणाला लावून, कर्जबाजारी होऊन हा सारा व्याप उभारला त्यांच्या वाट्याला काय येते? या देशाचा नागरिक सुखी व्हावा, संपन्न व्हावा, त्याचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ, सोपे व्हावे यासाठी हे सारे उद्योजक आपापल्या संसाराकडे दुर्लक्ष करून उद्योगाची उभारणी करीत आहेत. या उद्योजकांचे कौटुंबिक जीवन हा आणखी एक वेगळा (लेखाचा) विषय होईल इतका बोलका आणि अर्थपूर्ण आहे. एका तरुण उद्योजकाने सांगितले, 'माझी यंत्रांची पार्सले बंगलोरला पोचल्याचा आनंद, स्वतः बंगलोरला जाण्यापेक्षा माझ्या पत्नीला अधिक होतो. आमचे बंगलोर, काश्मीर, उटी, अबू इ. सारे इथेच आहे!' या साऱ्यांच्या सहधर्मचारिणी खऱ्या अर्थी सहधर्म आचरत आहेत. असे हे सैनिक उद्योगआघाडीवर आपले सारे कौशल्य पणाला लावून, जीवनाचा उन्हाळा करून लढत असताना, पंख्याखाली आरामात बसून कामे करणारे (?) सरकारी अधिकारी, कारकून व शिपायी यांच्याशी कसे वागतात? सरकारी खात्यातील माणसांप्रमाणेच वागतात.

## कर्जासाठी हेलपाटे

बँकेत वा इतरत्र कोठेही कर्ज मागायला जाणारे हे उद्योजक आपला 'प्रोजेक्ट रिपोर्ट' देतात. अनेक वेळा फेऱ्या मारतात. प्रत्येक फेरीला नवे काही तरी आणायला सांगतात. कोणत्याही बँकेत (किंवा वित्तमहामंडळात) लघुउद्योजकाला कर्ज हवे असेल तर त्याने कोणकोणते कागदपत्र आणावेत, कोणते अर्ज भरावेत हे पहिल्याच वेळेला सांगत नाहीत. (तसे मार्गदर्शनच मिळत नाही. मार्गदर्शन करणारी पुस्तिका का असू नये?) महिनोन् महिने रखडवून, अनेक वेळा चकरा मारायला लावून हे बँककर्मचारी सहा महिन्यांनी काय सांगतात, 'आठ दिवसांनी तुमचा चेक पास होईल. आज जर पाच टक्के मला देत असाल तरच तो चेक मिळेल!' काहीजण इतका बेडरपणा (की बेरडपणा) दाखवीत नाहीत. त्यांची दिरंगाईच बोलकी असते. हे सारे उद्योजक नोकरी नसणारे किंवा असलेली नोकरी सोडून स्वतंत्र व्यवसाय करू पाहणारे असतात. त्यांच्या वेळेला, श्रमाला काहीच का किंमत नाही? एका धडपड्या उद्योजकाने सांगितले, 'मी पैसे (लाच) द्यायचे नाही असे ठरविले. (तत्त्व म्हणून आणि जवळ नव्हतेही). मी एका बँकेतून दुसऱ्या बँकेकडे जसा फुटबॉलसारखा लाथाडला जात होतो. शेवटी एका सहाव्या मजल्यावर ऑफिस असणाऱ्या बँकेने नाही म्हटल्यावर तेथूनच उडी टाकून आत्महत्या करावी असे वाटू लागले. कारण असलेली चांगली नोकरी सोडलेली, नोकरी सोडताना आलेला पैसा खर्च झालेला आणि कर्ज तर मिळत नाही! मग काय करावे? जीव द्यावा असे प्रकर्षाने वाटू लागले; पण मित्रांनी, घरच्यांनी धीर दिला तसा सावरलो!' हा उद्योजक आपल्या कल्पकतेने, श्रमाने आज चांगला जम बसवून आहे. नवे नवे प्रयोग (शेतीसाठी उपयुक्त यंत्रांचे) करतो; पण कर्ज मिळत नाही म्हणून निमूटपणे मिळेल ती नोकरी करणारे, आपली प्रतिभा, आपले कौशल्य विसरून कोणाकडे तरी सांगितले काम–केले काम–घेतले–दाम–असे करीत जीवन कंठीत असतील कोणास ठाऊक? त्यांच्या व्यवसायाला ठेच लागते भ्रष्टाचाराची. सुरुवात होते भ्रष्टाचाराने आणि शेवट परमेश्वराला ठाऊक!

कर्ज मिळताना ही परिस्थिती. कर्ज मिळाले की उद्योगउभारणी करताना ज्यांच्या-ज्यांच्याशी संबंध येतो त्या त्या साऱ्यांना लाच द्यावीच लागते. उद्योग सुरू करताना लाच, चांगला चालतो आहे म्हणून लाच आणि उद्योग चांगला चालावा म्हणून लाच ही दिलीच पाहिजे! काम व्हावे असे वाटत असेल तर दाम (लाच) दिलाच पाहिजे हा नियमच आहे इथला. एक उदाहरण सांगतो. फार बोलके आहे. एका उद्योजकाने जम बसल्यावर मालाच्या ने–आणीसाठी एक मॅटॅडोर खरेदी केली. दुसऱ्या दिवसापासून संबंध येणाऱ्या सरकारी आणि निमसरकारी कार्यालयातून फोन येऊ लागले (होय! अगदी शिपाई–पट्टेवाल्यापासून) "जरा दोन तासांसाठी गाडी पाठवा!" "चार दिवस हवापालट करून येऊ म्हणतो आहे. ड्रायव्हर पाठवायला विसरू नका. हो आणि टाकी पूर्ण भरायला विसरू नका हं!" परिणाम काय झाला? उद्योजकाने मिळेल त्या किंमतीला मॅटॅडोर फुंकून टाकली! या साऱ्यांना नकार देण्याची हिंमत त्या उद्योजकाची नव्हती. कारण नकाराची किंमत त्याला ठाऊक होती. एका उद्योजकाने सांगितले, हे सरकारी अधिकारी (विशेषतः विक्रीकर, आयकरखात्यातील) आम्ही उद्योजक म्हणजे चोर, बदमाश, लफंगे, फसवे आणि खोटारडे आहोत अशाच भावनेने आमच्याशी बोलतात किंवा वागतात. आमच्या सांगण्यावर त्यांचा विश्वास नसतो. आम्ही तळमळीने पटवून देण्याचा प्रयत्न करतो तरी त्यांना ते पटत नसते. आमचे सारे सांगणे (खरे वा खोटे) पटते केव्हा, जेव्हा त्यांनी मागितलेली रक्कम त्यांच्या हातात ठेवतो तेव्हा काही अधिकारी पैसे मागतात (उद्योजक देतात) तर काहीजण (उद्योजक) पैसे न देता इतर मार्गांनी त्या अधिकाऱ्यांना खूष करतात. त्यांना खूष हे ठेवावेच लागते! मी एकाला विचारले, 'तुम्ही परवाना काढीत असाल. तुमचे वागणे, हिशेब बेकायदेशीर असतील म्हणून तुमच्याकडे ते पैसे मागत असतील.' उत्तर मिळाले, 'सरकारी नियम आणि कायदेच असे आहेत की, त्यांचे काटेकोरपणे पालन करावयाचे म्हटले तर व्यवसायच करणे अशक्य होईल! सारी शक्ती त्या नियमांचे पालन करण्यातच खर्च होईल!' एकाने गमतीने म्हटले की 'सरकारने इतके नियम व कायदे केले आहेत की बहुधा सरकारचीच इच्छा ते आम्ही पाळावे अशी नसावी.' 'की आपल्या नोकरांची वरकमाईची सोय व्हावी?' माझी मल्लीनाथी. एकाने सांगितले 'माझ्या

व्यवसायासाठी कालपर्यंत एक्साईज लायसन्स काढावे लागे. आज मात्र तो उद्योग सुरू करणाऱ्यास तसे लायसन्स काढावे लागत नाही; पण मी (माझ्यासारख्यांनी) वर्षातून एकदा ते लायसन्स नूतनीकरण करून घेतलेच पाहिजे अशी सक्ती आहे. ह्या लायसन्सची फी आहे रु ५।–फक्त. मला खर्च येतो फक्त रु. १०५।– स्टॅम्प रु. ५।–चा व अधिक एक शंभराची नोट तो स्टॅम्प उडून जाऊ नये म्हणून ! मी देतो. कारण मला डोकेदुखी, त्रास नको असतो. त्यांना जे हवे ते दिले की कटकट टळते. मला माझे काम करायला उसंत मिळते. सरकारी नोकर किती त्रास देऊ शकतात हे ठाऊक आहे मला. मला माझा व्यवसाय करायचा आहे. कारण त्याच्यावरच माझे कुटुंब अवलंबून आहे. हे सारे पैसे आम्ही देतो कुठले ठाऊक आहे काय ? अहो, हे सारे पैसे आम्ही वसूल करतो गिऱ्हाइकाकडूनच. जर लाचखोरी बंद झाली तर आम्ही आमचा माल किमान पाच ते दहा टक्क्यांनी स्वस्त देऊ शकू !'

## जकातनाक्यावर....

मी वर असे म्हटले की 'शेवट परमेश्वराला ठाऊक !' ह्या शेवट म्हणजे पक्का माल तयार झाला म्हणजे शेवट झाला. हा परमेश्वर शेवट ठरवितो. कोठे आहे हा परमेश्वर ? हा परमेश्वर आहे जकातनाक्यावर. त्याला त्याचा नैवेद्य दिलाच पाहिजे ! नैवेद्याशिवाय तो संतुष्ट होत नाही. मी विचारले, 'जकातनाक्यावर तुम्ही तुमच्या मालाचे वजन, किमत प्रामाणिकपणे सांगत नसाल ! तुम्हीच जकात चुकविण्याचा प्रयत्न करीत असाल !' 'जकातनाक्यावर आणि प्रामाणिकपणा ? कोणत्या नंदनवनात आहात ?' जर एखादा व्यापारी वा उद्योजक प्रामाणिकपणे केवळ जकातच देऊ लागला तर काय होते ते ऐका ! 'त्याचा ट्रक वा टेम्पो एका बाजूला थांबविला जाईल. मालाची मोजणी होईल. किमत ठरवली जाईल. ही किमत माझ्या प्रामाणिकपणे सांगण्याप्रमाणे न धरता ते चिरंजीव (स्वयंभू आणि सर्वज्ञ ) नाकाकारकून–ऑफिसर ठरवणार आणि ते म्हणतील तेव्हढी जकात लगेच भरावी लागेल ! या साऱ्याला वेळ लागेल फक्त आठ ते दहा तास !', 'मग तुम्ही काय करता ?' माझा मूर्खपणाचा प्रश्न. माझी अजिबात कीव न करता तो म्हणाला, 'महानगरपालिकेला ( पालिकेला वा पंचायतीला) ५००।– रुपये द्यायला तयार असणारे आम्ही त्या कारकुनाला देतो रु. १००।– आणि जकात भरतो रु. १००।– आमचे काही तास व तीनशे रुपये किमान वाचतात ! ( ट्रक, टेम्पोचे भाडे, गिऱ्हाइकाचा खोळंबा इ. खर्च वेगळाच). काम कसे चटकन होते. 'तुम्ही खा आम्ही खातो. तो श्रीराम सर्वांस देतो' एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' ( खरे म्हणजे कुपंथच) याची खरीखुरी प्रचीती पाहायची असेल तर जकातनाक्यावर जा ! म्हणूनच म्हटले आहे की विना सहकार नही उद्धार. सारांश कर्ज हवे द्या लाच, पाणी, वीज कनेक्शन हवे काढा नोटा, लायसन्स हवे करा थैली मोकळी, टेंडर पास झाले पाहिजे सरकवा पाकिटे, माल बाहेर नेणे आहे खणखणत्या नाणी ! या सर्वव्यापी, सर्वस्पर्शी, लाचखोराच्या कृपेनेच आम्ही जगणार आणि वाढणार आहोत. लाच खाण्याला ( आणि देण्याला) पर्याय नाही.

'ह्या जकातजाचाला विरोध आहे म्हणूनच आम्ही डोंबिवली नगरपालिकेच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षेला विरोध करीत आहोत.' 'तुम्हाला आणखी कोणत्या अडचणी जाणवतात, भेडसावतात' या प्रश्नाला दिलेले हे उत्तर. डोंबिवली न. पा. परिषदेने (यापुढे परिषद असा उल्लेख होईल). आपली हद्द वाढवून या परिसरातील सारी उद्योगनगरी व लगतची खेडी डोंबिवली परिषदेच्या हद्दीत समाविष्ट करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र सरकारने त्याला संमती दिली आहे. (जनता अधिक पुलोद+अधिक अधिक सत्तेवर असताना. आता काय कोणास ठाऊक ? ). प्रत्येक प्रश्नाप्रमाणे याही प्रश्नाला दोन बाजू आहेत. प्रथम लघुउद्योजकांची बाजू लक्षात घेऊ या. त्यांच्या मते हा त्यांच्या जीवनमरणाचा, अस्तित्वाचा प्रश्न आहे. 'तुमचा परिषदेत समाविष्ट होण्याला विरोध का आहे ?' 'परिषदेच्या हद्दीत गेल्यानंतर प्रथम आम्हाला भरावे लागतील विविध प्रकारचे कर. उदा. प्रॉपर्टी टॅक्स, जकात इ. ही कराची रक्कम भरणे आमच्या ताकदीबाहेरचे होईल. आज आम्ही आमच्या पंचायतसमितीला नाममात्र कर देतो. उद्या परिषदेला जबर कर द्यावा लागेल. आम्ही ज्या वेळेस येथे आलो तेव्हा MIDC ने असे आश्वासन दिले होते की आमचा परिषदेशी संबंध येणार नाही. आमची नगरी स्वतंत्र असेल. याचा अर्थ असा की, आम्हाला कोणतेच न पेलयणारे कर द्यावे लागणार नाहीत. महामंडळाने दिलेल्या आश्वासनाचा हा भंग आहे. अगदी Breach of Contract म्हणा ना. विविध करांमुळे अगोदरच मेटाकुटीला आलो आहोत. परिषदेच्या या जबरदस्त तडाख्याने आम्ही भुईसपाट होऊ ! आजारी असणारे उद्योग बंद पडतील, जेमतेम चालणारे आजारी होतील व बऱ्यापैकी चालणारे डबघाईला येतील ! ह्या नगरीत होणारा कोणताच माल स्पर्धेत उतरू शकणार नाही. सरवली (कल्याण), अंबरनाथ, बेलापूर ह्या विभागात होणारा माल आमच्यापेक्षा स्वस्त पडेल. आमच्या मालाला गिऱ्हाईक मिळणार नाही. आम्ही सर्वस्वी नागवले जाऊ. परिषदेचे जकातखाते म्हणजे आमचा पैसा व वेळ खाणारेच न होता आम्हाला सतत डोकेदुखीचेच ठरणार आहे. (एकजण म्हणाला 'कोण्या दूरदृष्टीच्या, शहाण्या माणसाने सरकारी विभागांना (कचेरीतील) 'खाते' हा शब्द वापरला कोणास ठाऊक ? इतका अन्वर्थक शब्द दुसरा कोणताच नसेल ! जे सतत खातच असते ते खाते.') इतका कर वसूल करून ही परिषद आम्हाला कोणत्या सुखसोयी देणार आहे ? अहो, ज्या परिषदेला आपल्याच नागरिकांना किमान सोयी पुरवता येत नाहीत ती परिषद आम्हाला कोणत्या सोयी देणार ? आम्ही आज ज्या सोयी-सवलती उपभोगीत आहोत त्या पुरेशा नसल्या तरी इतका कर भरून काहीच जादा पदरात न पडण्यापेक्षा आहे ही व्यवस्था चांगली आहे असे मानावयास हरकत नाही.' आमचा समावेश डोंबिवली नगरपालिकेच्या हद्दीत होण्यास आमचा सक्त विरोध आहे. याबाबतीत साऱ्यांचेच एकमत दिसले. 'कामा'चे चिटणीस श्री. व्ही. एस्. काशीकर, टेक्नोक्रॅटसचे चिटणीस श्री. रमाकांत उपाध्याय यांच्यासकट साऱ्यांनी पोटतिडकीने या प्रश्नावर आपली मते मांडली. या साऱ्याचा निष्कर्ष असा की, काहीही होवो (Come what may) आम्ही परिषदेत समाविष्ट होणार नाही ! निदर्शने करू, मोर्चे काढू, उपोषणे करू, त्यांनी सरकार व परिषद ताळ्यावर येणार नसेल तर डोंबिवलीहून अन्यत्र जाऊ. अगदी वेळ आलीच तर वापीला (गुजरात राज्यात) जाऊ, गोव्याला जाऊ, कर्नाटकात जाऊ; पण येथे राहणार

नाही ! ही सारी राज्ये आमचे स्वागत दोहो हातांनी करण्यास सिद्ध आहेत. ही राज्ये आमचे स्वागत आनंदाने करतीलच; त्याशिवाय आम्हाला हव्या त्या सवलतीही देतील. वेळीच सरकारने जागे व्हावे व आमच्या गळ्याभोवती पडू पाहणारा परिषदेचा फास दूर करावा. परिषदेला आमच्याकडून दरवर्षी पंचाहत्तर लाख रुपये हवे आहेत. एकजण म्हणाला, 'अहो, त्यांनी तर आपल्या अंदाजपत्रकातच ही रक्कम जमेच्या बाजूला दाखवली आहे. या आकड्यावरून आम्हाला दरवर्षी किती बोजा सहन करावा लागेल याची कल्पना येऊ शकेल.'

## नगरपरिषदेची बाजू

या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे डोंबिवली नगरपालिका परिषदेची भूमिका. त्यांचे म्हणणे काय आहे हे समजून घेण्यासाठी मी नगराध्यक्ष श्री. श्रीपादराव पटवारी यांना भेटलो. ते म्हणाले, 'हा प्रश्न इ. स. १९६७ पासूनच आमच्यासमोर आहे. हा काही आजच नव्याने निर्माण झालेला नाही. डोंबिवली शहर झपाट्याने वाढत आहे. छोटे भारत (Mini India) असे स्वरूप या शहराला येत आहे. शहरात जागांची टंचाई व महर्गता असल्यामुळे परिषदहद्दीला लागूनच बांधकामे चालली आहेत. कित्येक ठिकाणी मोठमोठ्या वसाहती उठल्या आहेत. या साऱ्यांकडून उत्पन्न मिळत नाही; पण त्यांचा ताण पडतो शहरावर. नव्याने गावात येणाऱ्यांना जागा देता नाही. पश्चिमेला खाडीमुळे विस्ताराला वाव नाही. पूर्वेकडे MIDC शिवाय पर्याय नाही. माझ्यापुढे प्रश्न आहे तो काही लाख नागरिकांचा ! हे सारे भारतातलेच आहेत ना ? त्यांना येऊ नका असे म्हणता येत नाही व गावात तर जागा (जमीन) नाही. म्हणून मोकळी जागा असणारे MIDC क्षेत्रच उपलब्ध आहे. या परिसरातील आजच्या आणि उद्याच्या नागरिकांना किमान सुखसोयी देणे आमचे कर्तव्यच आहे. या औद्योगिक नगरीला आमचा पूर्ण फायदा घ्यावयाचा आहे; पण तोशीस न लागता. हे कसे चालणार ? डोंबिवलीच्या नागरिकांनी दिलेल्या करांवर त्यांनी आपल्या व्यवसायासाठी साऱ्या सवलती पदरात पाडून घ्यायच्या; पण कररूपाने काही द्यावयाचे नाही हे कसे चालणार ?' (एका उद्योजकाचे यावर म्हणणे असे की आजची डोंबिवलीची भरभराट झाली आहे आणि अधिक होणार आहे ती आमच्यामुळेच). बोलता बोलता नगराध्यक्ष असे म्हणाले 'तुम्ही (उद्योजक) सरकारकडे जाता मग मी पण त्यांच्याकडेच माझी बाजू मांडेन.' याचा अर्थ असा की, हा प्रश्न पालिकापातळीवर न राहता मंत्रीपातळीवर गेला आहे. हा असा त्रिकोण (उद्योजक, परिषद आणि सरकार) बनल्यामुळे गुंतागुंत वाढली आहे. मी नगराध्यक्षांना म्हटले, 'मला असे वाटते की, उद्योजकांचे प्रतिनिधी आणि परिषदेचे प्रतिनिधी असे जर एका ठिकाणी बसले तर या प्रश्नाची समाधानकारकपणे सोडवणूक होऊ शकेल.' त्यावर नगराध्यक्ष म्हणाले, 'मी मार्ग शोधण्याचा प्रयत्न करीत आहे.' श्री. पटवारी यांच्याशी झालेल्या बोलण्यावरून माझ्या असे लक्षात आले की, हा प्रश्न समजूतदारपणे सुटावा अशी त्यांची इच्छा आहे. ह्या उद्योजकांना त्रास होऊ नये, त्यांना कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या करसवलती मिळाव्यात, त्यांची भरभराट व्हावी अशीच धारणा परिषदेची आहे. कारण ते म्हणाले की, परिषदेच्या हद्दीतील उद्योजकांना इ. स. १९६९ ते १९७९ ह्या दशकात करमाफी दिली आहे. तसेच नव्याने समाविष्ट होणाऱ्या ह्या विभागातील उद्योजकांच्याही बाबतीत करता येईल. जकातकरवसुलीसाठी त्यांनी एक योजना सुचवली आहे. त्या योजनेत ह्या उद्योजकांना किमान त्रास होईल. त्यांनी जकातकरासाठी बँकेत करंट अकाउंट उघडून चार्टर्ड अकाउंटंटने मंजूर केलेली बिले स्वीकारून तिमाही, सहामाही हिशोब केला जाईल. अशा अनेक तऱ्हांनी त्यांच्या अडचणी दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करू; पण परिषदहद्दीत तुम्हाला यावेच लागेल. तुम्ही आमच्याकडे या, आपण एकत्र बसू व हा प्रश्न कसा समाधानकारकपणे सोडवायचा ह्याचा विचार करू. परस्पर सरकारकडे जाऊन हा प्रश्न सुटणार नाही. तो अधिक गुंतागुंतीचा बनेल !' नगराध्यक्षांशी बोलताना मला असे जाणवले की, हा प्रश्न सर्वांनी विनाकारण प्रतिष्ठेचा बनविला नाही ना ? श्री. वामनराव साठे यांनी यावर एक तोडगा सुचविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, डोंबिवलीशी संबंधच ठेवायचा नाही. सरकारने ठाकुर्ली स्टेशनवरून एक मोठा रस्ता बांधून तो ह्या नगरीसाठी द्यावयाचा. तोपर्यंत रेल्वेने आपला रस्ता (ठाकुर्लीस्टेशन ते बारा बंगला वसाहत) वापरावयास द्यावयाचा. त्यामुळे ह्या नगरीच्या वाहतुकीचा वा अन्य कोणताच ताण किंवा उपद्रव डोंबिवली परिषदेला होणार नाही. जर हा प्रश्न समाधानकारकपणे सुटला नाही तर काय ? डोंबिवली परिषदेने ही उद्योगनगरी सामावून घेतली (की गिळंकृत केली) की। त्यापाठोपाठ महाराष्ट्रातील इतर परिषदा (उदा. खोपोली, ठाणे, कल्याण, अंबरनाथ, रोहे इ.) हा कित्ता गिरवतील आणि तसे जर झाले तर काय होईल ? आजच महाराष्ट्रात उद्योग सुरू करण्यास नाखूष असणारे लघुउद्योजक महाराष्ट्राच्या बाहेर जातील. (गोवे, गुजराथ, कर्नाटक ह्या राज्यांतील सरकारे आणि लघुउद्योजक संचालनालये त्यांचे स्वागत करण्यास तयारच आहेत.) महाराष्ट्राचा त्यामुळे फायदा होणार की तोटा ? कोण ठरवणार ? कसे ठरवणार ?

## कामगारसंबंध

ह्या लघुउद्योजकांना हेच प्रश्न भेडसावतात काय ? इतर काही प्रश्न आहेत काय ? कामगार-अशांतता आहे काय ? कामगारांचे सहकार्य किती लाभते ? स्वयंरोजगार निर्माण करणारे तुम्ही कामगारांना कसे वागवता ? हे विचारल्यानंतर सर्वांचे म्हणणे असे पडले की, आज तरी इतर मोठ्या उद्योगधंद्यात दिसते तशी अशांतता नाही; पण भविष्यात काय होईल हे सांगता येत नाही. भूमिपुत्रांची, स्थानिकांची भरती करावी लागते. कारण त्यांच्या शेतजमिनी ह्या वसाहतीसाठी घेतल्या आहेत. सरकारी धोरणही स्थानिकांची भरती करावी असे आहे; पण हे सारे अकुशल कामगार आहेत. कुशल कामगार बाहेरून मिळवावे लागतात. हा कामगार आज तरी असंघटित आहे (त्यांची व्यापक संघटना बाळसे धरू लागली आहे), अकुशल आहे, गरजू आहे. आपला मालक पण आपल्यासारखाच आहे हे त्याच्या लक्षात येते. त्यामुळे त्यांचे सहकार्य चांगले मिळते. सरकारने ठरवून दिलेल्या किमान वेतनापेक्षा जास्त वेतन आम्ही देतो असे अनेकांनी सांगितले. 'बोनसचे काय ?' 'बोनस' असा देत नाही. कारण बोनस दरवर्षी द्यावाच लागेल. त्याऐवजी

बक्षिसी, दिवाळीसण-भेट अशा निमित्ताने एक महिन्याचा पगार (सानुग्रह अनुदान ?) देतो. अपघात होतात काय? जखमी अपंग झालेल्या कामगारांचे काय? ते कोर्टात जातात काय? ह्या प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, अपघात फारसे होत नाहीत. झाले तर किरकोळ स्वरूपाचे असतात. त्यामुळे भरपाईचा किंवा कोर्टात जाण्याचा प्रश्न येत नाही. 'एक्समोर एंटरप्रायजेस'चे श्री. वसंतराव धामणकर यांनी आपला एक अनुभव सांगितला. ते म्हणाले, 'माझ्याकडे काम करताना एका कामगाराचा (उत्तर प्रदेशी) हात मोडला. त्याचे व माझे संबंध (तसे आम्हा सर्वच लघुउद्योजकांचे कामगारांशी अगदी आपुलकीचे संबंध असतात.) चांगले असल्यामुळे त्याच्या औषधपाण्याचा खर्च मी केला. त्याला अवजड काम करता येणे शक्य नसल्यामुळे 'गावी जातो' असे म्हणाला. त्याला मी एकूण तीन-चार हजार रुपये दिले. तो कोर्टात गेला असता तर ह्यापेक्षा किती तरी अधिक रक्कम द्यावी लागली असती. त्याने माझ्याकडेच राहावे म्हणून त्याला राखणदाराचे किंवा तसलेच सोपे काम देण्याची मी तयारी दाखवली होती; पण त्याला गावीच जायचे असल्यामुळे माझा नाइलाज झाला.'

केमिकल कारखान्यातील कामगारांचे प्रश्न इतर कारखान्यांतील कामगारांपेक्षा वेगळे असतात हे जाणून मी गोप्रान केमिकल्सच्या श्री. गोपाळ गणेश देव यांना विचारले असता ते म्हणाले, 'मी माझ्या कामगारांना माझ्या कुटुंबियांप्रमाणे वागवतो. त्यांना कपडे, साबण, छोटे रुमाल देतो. त्यांच्या आरोग्याची काळजी घेतो. (त्यांच्यासाठी छोटेसे ग्रंथालयही त्यांनी चालविले आहे. त्यात अनेक नियतकालिके घेतली जातात.) मी एके ठिकाणी असे वाचले की सीमेंट व कोळसा खाणीत काम करणाऱ्यांना सीमेंटचा व कोळशाचा अपाय होऊ नये म्हणून कांदा व गूळ खायला सांगतात. मी कांदा व गूळ न देता (कांदा न देण्याचे कारण गमतीदार आहे. कांदे लहानमोठे असतात. कोणी लहान घ्यायचा व कोणी मोठा घ्यायचा ही भांडणे होऊ नयेत म्हणून) गूळ व दूध (दूध जवळजवळ साऱ्याच केमिकल्स कारखान्यात दिले जाते.) देतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला अपाय होत नाही.' कांदा व गूळ देण्याची पद्धत साऱ्यांनीच सुरू करावयास हरकत नाही.

ह्या परिसरात फिरताना लालबावटे (संपाचे निशाण) किंवा फलक दिसले नाहीत. (एखाद-दुसरा अपवाद) ह्याचा अर्थ इथे संप फारसे होत नसावेत. कामगार आपल्या मागण्यांसाठी संपाचेच हत्यार उचलीत नसावेत; पण अनेक ठिकाणी 'हेल्पर पाहिजेत', 'टर्नर्स, वेल्डर्स पाहिजेत' असे फलक वाचले. त्याचे कारण शोधता असे कळले की, अकुशल कामगार कुशल झाले की, मुंबईच्या किंवा अन्य ठिकाणच्या मोठ्या कारखान्यात अधिक पगारासाठी (असाही एक ब्रेनड्रेन) जातात. इथे सारे काही शिकतात; पण फायदा करून देतात इतर मोठ्या धंद्यांना. कारणे कोणतीही असोत. कामगार-क्षेत्रात, कामगार आघाडीवर (लघुउद्योजकांशी संबंधित) तरी सामसूम दिसते आहे. ह्या लघुउद्योजकांपैकी अनेकजण पूर्वी कोठे ना कोठे नोकरी करीतच होते, त्यामुळे स्वानुभवावरून कळले असावे की, कामगारांना असंतुष्ट ठेवून चालत नाही, चालणार नाही. असंतुष्ट कामगार लघुउद्योगक्षेत्राला झेपणार नाही.

लघुउद्योजकांजवळ श्रम करण्याची ताकद आणि तयारी आहे, भांडवलाची सोय होऊ शकते, कल्पकता असते, कच्चा माल उपलब्ध होऊ शकतो, चांगल्या मालाला चांगले आणि सतत गिऱ्हाईक मिळते, असे असूनसुद्धा ह्या परिसरात बंद पडलेले, बंद पडण्याच्या मार्गावर असणारे, आजारी असणारे असे कारखाने का दिसतात? म्हणून विचारले असता ह्या प्रश्नाला किती विविध कारणे असू शकतात हे कळले. त्याचप्रमाणे ही कष्टाळू, बुद्धिमान तरुण मंडळी एखादा प्रश्न हातात घेतला की त्याचा किती खोलवर व बारकाईने विचार करतात हेही कळून आले.

## विधायक सूचना

श्री. एस्. एन्. मयेकर हे 'थायरॉन इलेक्ट्रिकल्स' या इंजिनियरिंग कारखान्याचे तरुण मालक. त्यांचा आपल्या विषयाचाच अभ्यास आहे असे नाही तर आपल्या लघुउद्योगाच्या संबंधातल्या अनेक प्रश्नांचा अभ्यास आहे. त्यांनी डबघाईला येणाऱ्या, बंद पडणाऱ्या लघुउद्योगांचा सूक्ष्म व व्यवहार्य विचार केला आहे असे वाटले. त्यांना विचारले असता ते म्हणाले, 'ह्या प्रश्नाकडे कोणीच लक्ष देत नाही. आम्ही लघुउद्योजक अनेक वेळा व्यवस्थापनकौशल्यात कमी पडतो, सतत कच्च्या मालाचा पुरवठा होत नाही, योग्य वेळी भांडवलाची सोय होत नाही, मालाची ऑर्डर मिळते तेव्हा असणारी कच्च्या मालाची किंमत व प्रत्यक्ष माल बनवायला सुरुवात करतो तेव्हा (विकत घेतो तेव्हा) असणारी किंमत ह्यात फार तफावत पडते. अशी अनेक कारणे आमचा छोटा व्यवसाय डबघाईला येण्यामागे आहेत.' 'त्यावर काही उपाय सुचवू शकाल का?' असे विचारले असता ते म्हणाले, 'त्याला उपायही आहेत. जेव्हा आमचा प्रोजेक्ट रिपोर्ट जातो (बँकेकडे किंवा वित्तमहामंडळाकडे) तेव्हा आमच्याजवळ असते योजना. ही योजना मंजूर झाल्यापासून कर्ज मंजूर होईपर्यंतच्या काळात आम्हाला व्यवस्थापनाचे शिक्षण देण्याची सोय हवी. हातात भांडवल पडताना आम्ही व्यवस्थापनकौशल्यात तरबेज, पारंगत झालो नाही तरी त्याची पुरेशी कल्पना यावी. हे शिक्षण जसे आम्हाला आवश्यक आहे तसे ते कर्ज मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही दिले जावे.' 'हे शिक्षण कोण देईल?' त्यावर ते म्हणाले, 'सरकारने निर्माण केलेल्या जिल्हा औद्योगिक केन्द्रांतर्फे ही सोय करता येईल.'


ते पुढे म्हणाले की, 'केन्द्र सरकारने लघुउद्योजकांसाठी 'इंटरेस्ट सबसीडी' योजना सुरू केली आहे. केन्द्र सरकार पहिल्या तीन वर्षांसाठी साडेसात टक्क्यांपेक्षा जास्त असणाऱ्या व्याजातला फरक परत देते. महाराष्ट्र सरकारने ही योजना समजून घेतली नाही किंवा त्यांचे दुर्लक्ष झाले म्हणा, ही योजना प्रत्यक्षात येऊ शकली नाही ही वस्तुस्थिती आहे. ह्यासाठी ठेवलेले, तरतूद केलेले (अंदाजपत्रकात) पैसे केन्द्राकडे पडून आहेत. ही योजना जर राबविली गेली तर लघुउद्योजकांना खूपच मदत होईल.' त्याचप्रमाणे श्री. मयेकर यांनी आयकराच्या संदर्भात एक अभिनव योजना सुचविली आहे. ते म्हणाले, 'ज्या उद्योजकांचा व्यवसाय चांगला चालू लागला आहे अशा उद्योजकांना जर आयकर काही हजार रुपये भरावा लागत असेल तर ते उद्योजक हा आयकर आपल्या खेळत्या भांड-

बलातून भरण्यास का कू करतील. त्यांचा कल हा कर टाळण्याकडेच असेल. त्याऐवजी तेवढी रक्कम केन्द्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या व्याजदराने कर्ज म्हणून त्या उद्योजकाला द्यावी. त्यामुळे कर टाळण्याची प्रवृत्ती कमी होईल व खेळते भांडवल कमी पडून होणारे नुकसान टळू शकेल.' श्री. मयेकरांची ही योजना कितपत व्यवहार्य आहे, त्यात कायद्याच्या कोणत्या अडचणी येतील, त्या दूर करता येतील की नाही ह्याचा गंभीरपणे विचार व्हावा असे वाटते.

'पॉलीमार इंडस्ट्रीजचे' मालक श्री. आर. एम. कुलकर्णी यांनी एका उदाहरणाच्या सहाय्याने लघुउद्योजकांचे दुखणे नेमकेपणाने मांडले. ते म्हणाले, 'एखाद्या गणपती बनविणाऱ्या कलावंताला पाच हजार रुपये कर्ज दिले. ते पाच हजार रुपये गणपती बनविण्यातच खर्चून गेले. शिल्लक काम राहिले रंग लावण्याचे. त्यासाठी त्याची गरज आहे पाचशे रुपयांची. ते पाचशे रुपये त्याला जर (वेळीच) मिळाले नाहीत तर त्याची मेहनत, ते कर्ज (पाच हजार) सारेच वाया जाईल! कारण रंगविल्याशिवाय गणपतीच्या मूर्तीला विचारतो कोण? अशी अवस्था आमची होते.' ते पुढे म्हणाले की, 'आम्ही सारे लघुउद्योजक सरकारच्या ज्या योजना (जाहीर केलेल्या, कागदावर उतरविलेल्या) असतात. त्या वाचून ह्या व्यवसायात उतरतो. त्या योजनांचे आकर्षण वाटते म्हणूनच ना हे धाडस आम्ही करतो! पण अडचण आहे ती ही की, कागदावरची योजना, दाखविलेली आमिषे राहतात कागदावरच आणि प्रत्यक्षात वाट्याला येते दुसरेच! आम्हा साऱ्या लघुउद्योजकांची किमान अपेक्षा ही आहे की, तुम्हीच आखलेल्या योजना प्रत्यक्षात आणा. त्यांना मूर्तरूप द्या. आमचे मागणे लई नाही. तेव्हढे जरी केलेत तरी हा व्याप कारणी लागेल. लघुउद्योगांचे क्षेत्र भरभराटीला येईल. सुशिक्षित बेकारांना व्यवसाय मिळेल. स्वयंरोजगारी वाढेल. नवे नवे प्रकल्प प्रत्यक्षात येतील. आम्ही कोणत्याच बाबतीत कमी पडणार नाही.' श्री. वसंतराव धामणकर म्हणाले, 'सरकारने कच्च्या मालाचा सतत व नियमित दराने पुरवठा करावा, मालाच्या गिऱ्हाइकाची शाश्वती (जमल्यास) द्यावी. आम्ही तुम्हाला हवे ते आणि हवे त्या उच्च दर्जाचे उत्पादन करून देतो. तेवढे तंत्रज्ञान, कौशल्य व प्रतिभा आमच्याकडे आहे.'

डोंबिवलीच्या परिसरात झपाट्याने उभी राहिलेली ही नगरी म्हणजे अलीबाबाची गुहा आहे. ह्या गुहेत अनेक नररत्ने आहेत. (तशी ती महाराष्ट्रभर पसरलेल्या अनेक उद्योगनगरांतही आहेत.) त्यांची काही स्वप्ने आहेत. ही स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी वैयक्तिक सुखाचा, कुटुंबाच्या सुखाचा विचार न करता जिवाचे रान करीत आहेत. कारकुनी, मास्तरकी, डॉक्टरकी, वकिली अशा परंपरागत मळलेल्या वाटेने, चाकोरीतून न जाता वेगळ्या वाटेने जाण्याची इच्छा असणारे हे औद्योगिक आणि आर्थिक आघाडीवरचे सैनिक आहेत. त्यांच्यात वेगळा हेतू ठेवून काही वाईट लोक यात शिरलेही असतील; पण त्यांचा विचार करण्याचे कारण नाही. त्यांचा बंदोबस्त कायद्याच्या रक्षकांना इच्छा असेल तर करता येईल; पण अपवादात्मक असणाऱ्यांचा विचार न करता ज्यांच्या मनात स्वार्थाबरोबरच समाजाचा, देशाचा विचार आहे, त्यांना मदत करणे हे नगरपालिकांचे, सरकारी सेवकांचे, बँकांचे, वित्तमहामंडळांचे आद्यकर्तव्य आहे. या कर्तव्यात चुकारपणा होऊ नये म्हणून गंभीर इशारा द्यावासा वाटतो. काही रुपयांसाठी प्रगतीचा वारू अडवू नका! भावी काळ क्षमा करणार नाही! ☐


हुकूमशहा सत्तेवर कसे येतात?
राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते?



या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी (सचित्र)
किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

प्रा. शरद वाघ

# डॉ. भणगे यांचे शिक्षणविषयक विचार

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु कै. डॉ. मा. शं. भणगे हे एक उत्कृष्ट शैक्षणिक प्रशासक होते. अशा व्यासंगी व अभ्यासू व्यक्तीची सारी शक्ती विद्यापीठाच्या शुद्धीकरणात, तांत्रिक गोष्टीत व तदनुषंगिक सरकारी कामकाजात इतकी खर्च होते की, लेखनासाठी स्वतंत्र वेळ मिळत नसे. शिक्षण-क्षेत्रात तर हे फार जाणवते. ज्यांनी लिहावे असे वाटते ते लिहीत नाहीत. विविध निमित्तांनी बोलण्याचे योग येतात. भाषणे होतात. प्रासंगिक स्फुटलेखन होते; पण रात्रभर रंगलेली मैफल कोठे अन् तीन मिनिटांची ध्वनिमुद्रिका कोठे ?

मॅजेस्टिक बुक स्टॉलने प्रकाशित केलेल्या डॉ. भणगे यांच्या 'शिक्षणाच्या दिशा' हे पुस्तक वाचताना वरील विचार मनात आले. यात एकूण अकरा लेख आहेत. त्यांचा नीट क्रम लावलेला नाही. विद्यापीठाचे कार्य, आजकालची महाविद्यालये, प्राध्यापक या विषयांवरचे लेख, असा एक गट; शिक्षण, प्रसार दर्जा आणि उपयुक्तता, दलित विद्यार्थी असा दुसरा आणि तिसरा आत्मचिंतनपर असे वर्गीकरण करता आले असते. विषयवार अनुक्रमणिका देता आली असती. आहे तशी अनुक्रमणिकाही का दिली नाही ते कळत नाही.

परीक्षणाच्या दृष्टीने आपण असे वर्गीकरण करू. विद्यार्थीवर्गापासून सुरुवात करू. 'कॉलेज–जीवनाचा आदर्श' या लेखात डॉक्टर लिहितात, 'स्वातंत्र्योत्तर काळात स्वातंत्र्यामुळे सबंध समाजच बदलला तसा विद्यार्थीही बदलला. समाजात स्वार्थ वाढला, आदराची भावना कमी झाली, निष्ठा पातळ झाल्या. दोन पिढ्यांमध्ये तुलना न करता प्रत्येक पिढीची तिच्या काळाशी तुलना केली पाहिजे. मिळालेल्या संधीचा विद्यार्थी किती फायदा घेतो ? कॉलेजातील भव्य ग्रंथागारे सलारजंग म्युझियम ठरणार की काय ? विद्यार्थ्यांनी खऱ्या अर्थाने कॉलेजजीवन जगावे, नुसता त्याला स्पर्श करू नये. कॉलेजजीवन हे एक समाजजीवन आहे. इंग्लंडमधील एका महत्त्वाच्या शैक्षणिक अहवालात (रॉबिन्स कमिटी रिपोर्ट) म्हटले आहे, Institutions of higher education are not merely placer of instruction They are Communities." 'तू येथे काय मिळविलेस ?' या लेखात डॉक्टरांनी आजकालच्या शिक्षणसंस्थांच्यामधे आढळणाऱ्या पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना हा प्रश्न टाकला आहे. "विद्यार्थी कॉलेज सोडून जाऊ लागला म्हणजे त्याला विचारावेसे वाटते, 'तू येथे काय मिळ–विलेस ?' पण ते धाडस मला होत नाही. तो पाठमोरा जात असताना माझ्याशीच मी म्हणतो, 'बिचारा चार वर्षांपूर्वी आला तसाच तर जात नाही ना ?' त्याची गरिबी लक्षात आली तर विचाराने मन आणखी कासावीस होते.'

'दलितवर्गातले विद्यार्थी' हा या संग्रहातला एक उत्कृष्ट वैचारिक निबंध आहे. 'द पुअर आर् ऑल्वेज विथ यू' ह्या ख्रिस्तवचनाच्या केन्द्रबिंदूपाशी सारा विचार गुंफला आहे. दलित मुलांची काळजी घेणारा नवा पुढारीवर्ग कॉलेजकारभारात, अशैक्षणिक कार्यात हस्तक्षेप करून कसा गोंधळ निर्माण करतो हे कटू सत्य डॉक्टरांनी अनुभवले आहे. शिक्षणाच्या दिशा चाचपताना हे सारे जाणवते.

दलितांच्या अशुद्ध भाषण व लेखन व मर्यादित वाचन याबद्दल त्यांनी कठोर उद्‌गार काढले आहेत. हे उद्‌गार एका ध्येयवादी प्राध्यापकाचे आहेत. राजकारण खेळणाऱ्या पुढाऱ्याचा हा खेळ नाही. दलित विद्यार्थ्यांच्या व्यथा वाचताना डोळ्यात पाणी येते. खडी टाकणारा विद्यार्थी, महागडा पी. टी. युनिफॉर्म परवडत नाही म्हणून पी. टी. चुकविणारा विद्यार्थी, वेश्याव्यवसाय करणाऱ्या आईची मुलगी, तीस मैलांवरून एस. टी. ने येणारे जेवणाचे डबे, उपासमार अशी अनेक उदाहरणे देऊन दलित विद्यार्थ्यांच्या समस्या किती बहुरंगी आहेत इकडे डॉक्टर आपले लक्ष वेधून घेतात. त्यांनी स्वतःच्या समस्या माउलीच्या हृदयाने सोडविल्या आहेत. अशा विद्यार्थ्यांना कसे शिकवावे, शिक्षणाचा आशय बदलता येईल का ? अध्यापनपद्धत बदलणे शक्य आहे का ? वर्ग लहान करावे, चाकोरी-बाहेरची माहिती द्यावी असे काही मार्गही सुचविले आहेत.तथापि हा सारा भाग अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे यावर अधिक पाने पाहिजे होती.

'शिक्षण : प्रसार, दर्जा आणि उपयुक्तता' हा असाच एक विचाराला चालना देणारा महत्त्वाचा निबंध आहे. शिक्षणाचा प्रसार पाहून समाधान वाटते. स्वेदगंगा आणि वेदगंगा ह्यांचा हा मनोहर संगम आहे. ह्याचबरोबर शिक्षणाचा दर्जा व उपयोगिता याचाही विचार व्हावयास हवा. एक्स्टर्नल विद्यार्थ्यांसाठी कॉलेजनेच सकाळ–सायंकाळी वर्ग भरवावेत.ज्ञानाचा बोध व्हावयाचा असेल

तर बोधभाषा म्हणून मातृभाषाच वापरावी, मराठीस प्रतिष्ठा द्यावी, शिक्षणाचे पावित्र्य राखावे, शिक्षणसंस्था काबीज करताना होणारे गैरप्रकार, अदृश्य दडपणे, मोठ्या संख्येचे वर्ग व त्याचे तोटे, उत्पादनकौशल्य वाढविणारे शिक्षण कसे हवे याचा विचार, गरीब मुलांसाठी अल्पमुदतीचे अभ्यासक्रम अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांचा डॉ. भणगे यांनी विचार केला आहे. सर्व शिक्षणप्रेमी मंडळींनी व विचारवंतांनी तो मुळातूनच वाचला पाहिजे.

'प्राध्यापकाची भूमिका' यात प्राध्यापकमंडळी काही वाचीत नाहीत अशी तक्रार आहे. त्यासाठी नगर व दिल्ली येथील प्राध्यापकांचा अभ्यास यावर केलेल्या संशोधनाची आकडेवारी दिली आहे. प्राध्यापकबंधूंनी निदान एवढे तरी वाचावे. पृष्ठ ४३ वर रॉबर्ट गोदिनो या परदेशी लेखकाने 'दि इंडियन युनिव्हर्सिटीज' नावाच्या लेखात भारतीय प्राध्यापकाचे रंगविलेले चित्र विचार करायला लावणारे आहे. अशी अनेक वचने, पुरावे, उदाहरणे डॉक्टरांनी या लेखात दिली आहेत.

'विद्यापीठाचे कार्य' या निबंधात प्रश्नोत्तररूपाने घेतलेली मुलाखत आहे. स्वायत्त विद्यापीठ, शैक्षणिक क्रान्ती, निष्प्रभ ग्रामीण विद्यापीठे यावरचे विचार मौलिक आहेत. 'शेषप्रश्न' या शेवटच्या निबंधात या शैक्षणिक विचारांचे अधिक स्पष्टीकरण आहे.

निबंधक्रमांक दहाचे शीर्षक आहे 'वैयक्तिक आणि वैचारिक' शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून केलेले हे पहिले भाषण आहे आणि येथे भालचंद्र शंकर भणगे ह्या व्यक्तीची खरी ओळख होते. गरिबीतून वर येणारे, सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारे डॉ. पाहिले की, दुरावा नष्ट होतो. अधिक जवळीक निर्माण होते. 'गरिबांची कणव माझ्या शब्दात नसली तरी ती पोटात असते' हे त्यांचे एकच वाक्य त्यांच्याबद्दल खूपसे काही सांगून जाते. डॉक्टरांच्या साऱ्या जीवनाचा आलेखच अभ्यास करण्यासारखा आहे. 'रिगर' म्हणजे कामातील कडकपणा हा त्यांचा परवलीचा शब्द आहे. आज आपल्याला असे डोळस कर्तबगार कुलगुरु हवे आहेत.

विविध प्रसंगांनी झालेली वैचारिक भाषणे व स्फुट लेख यावर आधारलेले 'शिक्षणाच्या दिशा' हे ९० पानांचे शैक्षणिक पुस्तक उपयुक्त आहे, संग्राह्य आहे यात काहीच शंका नाही. डॉक्टरसाहेबांची शैली रसाळ आहे, मनमोकळी आहे. पाश्चात्य ज्ञानाचा सखोल अभ्यास, गरिबांबद्दलची कळकळ आणि ज्ञानाबद्दलची अपार निष्ठा, स्वसामर्थ्याची जाणीव अशा अनेक गुणांनी हे लेखन नटले आहे. ❊

**शिक्षणाच्या दिशा**
डॉ. भालचंद्र शंकर भणगे.
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई.
मूल्य : १२ रुपये.

## फिनिक्स निवड

# The Collapsing Universe

The story of Black Holes and extraordinary new findings on the Birth and Death of the Cosmos
By Isaac Asimov
(Pocket Books, pages 248 $ 2·25)

आयझेक ॲसिमोव्हनी आतापर्यंत दोनशे पुस्तके लिहिली आहेत. त्यातली बहुतेक सायन्स फॅक्ट किंवा सायन्स फिक्शनवर आहेत.

आपल्याकडे जशी अप्पासाहेब फडकेंनी अनेक विषयांवर पुस्तके लिहिली आहेत तशी ॲसिमोव्हनी साहित्यिक टीका, मानसशास्त्र, गणितशास्त्र, गूढकथा, कविता, विनोद, अमेरिकन इतिहास असे अनेक विषय हाताळलेले आहेत.

टॅलेन्टेड लोकांनी वल्गना केली तर आपल्यासारख्या लोकांनी ती खपवून घ्यावी. कारण पुष्कळ वेळा अहंभाव, प्रचंड बुद्धिमत्ता, टॅलन्ट, वल्गना हे गळ्यात गळा व हातात हात घालून हिंडतात. आर्थर क्लार्क हे असेच ॲसिमोव्हसारखे उत्कृष्ट सायन्स फॅक्ट व फिक्शन लिहिणारे. त्यांची या विषयावरची साहित्यिकनिर्मिती सुद्धा दर्जाच्या दृष्टीने प्रचंडच; पण फरक इतकाच की, क्लार्क हे साधे टाइपरायटर वापरतात. (ते थर्ड किंवा फोर्थ वर्ल्डचे रहिवासी आहेत म्हणून की काय ?) व ॲसिमोव्ह हे इलेक्ट्रिक टाइपरायटर वापरतात. या मुद्द्यावर काय पण ॲसिमोव्हनी बढाई मारली होती ! "माझ्या पुस्तकाची निर्मिती क्लार्कपेक्षा पुष्कळच जलद आहे. ते साधे टाइपरायटर वापरतात तर मी डाव्या हाताने एक व उजव्या हाताने एक असे दोन इलेक्ट्रिक टाइपरायटर्स वापरतो !"

बोस्टन युनिव्हर्सिटी स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये ते बायोकेमिस्ट्रीचे प्राध्यापक आहेत किंवा होते. मला वाटते असल्या लोकांचे मेंदू ते गेल्यावर संशोधनासाठी जपून ठेवावेत ! आइनस्टाइनने मेल्यावर आपल्या मेंदूचे संशोधन करावे असे आधीच लिहून ठेवले होते. तीन-चार वर्षांपूर्वी एक बातमी आली होती की, आइनस्टाइन जिथे इहलोक सोडून गेला त्या प्रिन्स्टन हॉस्पिटलचे डॉ. थॉमस हार्वे यांनी फॉर्मलडीहाइडमध्ये त्याचा मेंदू एका बरणीवजा खोक्यात ठेवला आहे. तो मेंदू ज्या खोक्यात आहे त्या खोक्याला त्यांनी Costa Cider असे नाव दिले आहे. चंद्रावरची माती व खडे जेव्हा पृथ्वीवर आले तेव्हा ते जसे अभ्यासासाठी जगाच्या प्रयोगशाळेत पाठवले गेले तसेच आइनस्टाइनच्या मेंदूचे छोटे छोटे तुकडे अभ्यासासाठी वेगवेगळ्या स्पेशॅलिस्टना दिले गेले आहेत ! पण सॅरिबेलम व सॅरीब्रल कॉर्टेक्सचा एक भाग अजून तसाच ठेवला आहे. अर्थात आइनस्टाइन व ॲसिमोव्ह यांची तुलना मी इथे करीत नाही. Comparison is always odious.

या प्रचंड विश्वासंबंधी लिहिणाऱ्या ॲसिमॉव्हना spaceobhopia आहे. ते म्हणतात, 'अवकाशात जायचो मला भीती वाटते. इतकेच नाही तर विमानात उड्डाण करण्याची पण त्यांना भीती वाटते. मोठ्या लोकांच्या त्रुटी व विक्षिप्तता वाचण्याचो फार मजा येते. हेन्रिक इब्सेन (डॉल्स हाउस' फेम) म्हणे लिहिताना टेबलावर एका जारमध्ये जिवंत विंचू ठेवत असे !

गुरुत्वाकर्षण जेवढे जास्त तितका काळ व वेळ संथावतो ! अंतराळात ब्लॅक होल्स, व्हाइट होल्स व वर्म होल्स अशी विवरे असतात. ब्लॅक होल म्हणजे आतमध्ये कोसळणारा

ताराच. तिथे गुरुत्वाकर्षण इतके जास्त असते की, प्रकाशसुद्धा निसटू शकत नाही. अशा कोसळणाऱ्या ताऱ्यांना न्यूट्रॉन स्टार म्हणतात. या ताऱ्यावरचा चमचाभर पदार्थ हजारो टनांइतका भारी असतो हे मी याआधी लिहिलेच आहे. ब्लॅकहोल्सजवळ काळ इतका संथावतो की, ब्लॅकहोलच्या एका टोकातून शिरून तुम्ही दुसऱ्या टोकाला निघून बाहेरून परत तेथेच आला की, तुम्ही तिथल्या तिथे होता असा भास होईल, असा एक दृष्टिकोन एका खगोलशास्त्रज्ञाने मांडला होता; परंतु ॲसिमॉव्ह असे म्हणतात की, एखादा अंतराळवीर ब्लॅकहोलमध्ये शिरला तर त्याला असे वाटेल की, अंतर हे सारखे प्रसरण पावत आहे. थोडक्यात म्हणजे ब्लॅकहोलमध्ये तो अंतराळवीर मध्यबिंदूवर जाऊन कधीच आदळणार नाही. अवकाशातले काळे विवर म्हणजे तळ नसलेला एक मोठा खड्डा. काळ्या विवरात तुम्ही एकदा शिरलात की, परत फिरणे शक्यच नाही.

अवकाशातील काळी विवरे ही आकाशगंगेच्या मध्यावर असतात व प्रत्येक आकाशगंगेच्या भोवती छोट्या छोट्या उपग्रहांसारखे ब्लॅकहोल्स असतात.

अवकाशात दोन काळ्या विवरांची टक्कर होऊन ती एक होऊ शकतात; पण ती एक झाल्यावर मात्र पुन्हा वेगळी होऊ शकत नाहीत. अशी या दोन दोन विवरांची टक्कर होऊन ते काळे विवर मोठे मोठे होत जाऊन मध्यभागी असलेल्या काळ्या विवरात विलीन होऊन एका आकाशगंगेचेच एक भले मोठे विवर होऊन बसते आणि अशी भली मोठी विवरे एका प्रचंड आकाशगंगेचे घटक होऊन बसतात. असे हे असीम काळपर्यंत चालू रहाते. शेवटी सबंध विश्वाचेच एक भले मोठे काळे विवर होऊन बसते की काय अशी शंका डॉ. ॲसिमॉव्ह व्यक्त करतात; पण असे होणार नाही असे ॲसिमॉव्हच पुढे म्हणतात. कारण की, विश्व सारखे प्रसरण पावत असते. ( Expanding Universe Theory) आणि या प्रसरण पावण्यामुळेच विश्वात निरनिराळे बदल घडून येतात.

परवाचे खग्रास सूर्यग्रहण पाहून एक माणूस म्हणाला होता, "अजि म्या ब्रह्म पाहिले !" पण एका आकाशगंगेचेच परिवर्तन एका भल्या मोठ्या काळ्या विवरात होते हे वाचून "अजि म्या कोटी ब्रह्म पाहिले !" असे आपल्याला वाटते. अवकाशातील हे द्वैत – अद्वैतिक खेळ बघून आपली मतीच गुंग होऊन जाते.

मॉरिस डायरेक यांनी १९३७ मध्ये एक गुरुत्वाकर्षणाविषयी धक्कादायक सिद्धान्त मांडला होता. जिथे जिथे विश्वाची घनता अधिक तिथे तिथे गुरुत्वाकर्षणाचा जोर अधिक; पण बरेच शास्त्रज्ञ म्हणतात की, gravitation constant हा प्रत्येक ठिकाणी सारखा असतो. काळानुसार तो बदलत नाही. तथापी आपण आताच पाहिले की, गुरुत्वाकर्षण जसजसे वाढत जाते तसतसा काळ संथावतो ही विधाने परस्परविरोधी वाटतात. शेवटी विश्वाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे नकाशाशिवाय एका महाभयानक दलदलीत चालण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे.

सतत प्रसरण पावत असलेले विश्व म्हणजे सतत घटत जात असलेले गुरुत्वाकर्षण. सतत प्रसरण पावल्यामुळे शेवटी विश्व म्हणजे एक भला मोठा पातळ ढग होऊन जाईल की काय असा आणखी एक प्रश्न ॲसिमोव्ह विचारतात.

खगोलशास्त्रात एक भारतीय नाव फार मोठे आहे. चंद्रशेखर सुब्रह्मणियन. १९३१ मध्ये त्यांनी Critical Mass विषयी एक सिद्धान्त मांडला होता. चंद्रशेखरांचा हा सिद्धान्त खोटा आहे असा दावा ॲसिमॉव्ह करतात.

विश्वातला तारा जेवढा प्रचंड तेवढी उष्णता त्याच्या उदरात जास्त. लहान ताऱ्यातली उष्णता कधीच मोठ्या ताऱ्याएवढी होऊ शकत नाही. ताऱ्याच्या गाभ्यामधून दोन प्रकारचे Massless Particles निर्माण होतात. ही दोन्ही पार्टिकल्स प्रकाशाइतकी गतिमान असतात. एकाचे नाव आहे Photon तर दुसऱ्याचे आहे न्यूट्रिनो. त्यातील Photons जे आहेत ते भोवतालच्या परिसरात शोषले जातात; पण न्यूट्रिनोज् हे मात्र कमालीचे झुकांडी देणारे असतात. समजा तुम्ही ते पृथ्वीच्या एका टोकावरून सोडले तर कसलेही विघ्न न जुमानता ते सरळ पृथ्वीच्या दुसऱ्या टोकातून निघतील ! आहे की नाही Abracadabra, whoosh ! या न्यूट्रिनोविषयी अजून बरीच माहिती मिळायची राहिली आहे; पण जेव्हा पुरेशी माहिती मिळेल तेव्हा कदाचित आपण atomic age मधून neutrio age मध्ये प्रवेश करू.

**–जे. एन्. पोंडा**


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | रुपये |
|---|---|---|
| १. | **धर्मानंद :** (कादंबरी) जयवंत दळवी | २५/– |
| २. | **रसमुग्धा ।** (शृंगारिक लेख) आनंद साधले | २०/– |
| ३. | **पाण्यावरची अक्षरे :** (समीक्षात्मक लेख) गंगाधर गाडगीळ | २०/– |
| ४. | **राजा ओयदिपौस :** (नाटक) पु. ल. देशपांडे | |
| ५. | **अरेबियन नाइटस् :** खंड ९ वा – अनुवाद–गौरी देशपांडे | ६०/– |
| ६. | **माझ्या खडतर जीवनातील अनेक प्रसंग :** (भाग १ ला, आत्मचरित्र) स. बा. हुदलीकर | ३०/– |
| ७. | **सेंचरी :** (कादंबरी) बाबा कदम | २५– |

**ENGLISH**

| | | Rs. |
|---|---|---|
| 1. | **I Robot :** (Science Fiction) – Asimov | |
| 2. | **Smiley's People :** (Spy Story – Bestseller) John Le Carre [ Hard Cover Edition ] | 80/– |
| 3. | **Ian Bothan :** (Cricket) Bob Farmer | 82·80 |

* कडक उन्हामध्ये हिंडून प्रकृती बिघडवू नका ! असह्य उन्हाळा 'फिनिक्स'ची सुंदर पुस्तके वाचून घालवा ! ! सुट्टीसाठी प्रवेशफीमध्ये भरपूर सवलत ! ! !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०.**

# दोन मेळावे : पृष्ठ ८ वरून

जवळजवळ पस्तीस वक्ते ठरावांवर बोलले. पण ती छोटेखानी भाषणंच होती.. ' खुली चर्चा ' असं त्यांचं स्वरूप नव्हतं. त्यामुळे नव्या पक्षाकडून कार्यकर्त्यांच्या आशा–आकांक्षा–अपेक्षा काय आहेत, हे व्यक्त झालं नाही. दुसरी एक प्रकर्षानं जाणवलेली बाब म्हणजे वैचारिक प्रतिपादनाच्या अभावाची. ढोबळ शब्दापलीकडे जाऊन नव्या पक्षाची वैचारिक बाजू मांडली गेली पाहिजे, अशी अपेक्षा बाळगणाऱ्यांना निराशाच स्वीकारावी लागली.पक्षउभारणीस आवेश, आक्रमकता आवश्यक असते, हे खरं;पण केवळ भावनांना आवाहन करून चालणार नाही, विचारही चेतविले पाहिजेत. पक्षात क्रियाशील कार्यकर्त्या तरुणांना दिलेलं स्थान आशादायक आहे, तितकंच स्थान वैचारिक कार्यकर्त्यांनाही देणं आवश्यक आहे, याची जाणीव होणं हीही मेळाव्याची जमेचीच बाजू मानायला हवी.

□

या मेळाव्यापाठोपाठ दुसऱ्याच दिवशी, १४ एप्रिलला मूळ जनता पक्षाचा मेळावा झाला. पुणे शहर जिल्हा जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचा हा मेळावा होता. त्यात पूर्वार्ध–उत्तरार्ध वगैरे प्रकार नव्हते. मेळाव्यापेक्षा जाहीर सभेसारखंच त्याचं स्वरूप होतं. जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष बबनराव ढाकणे, राजारामबापू पाटील आदि बडी मंडळी मेळाव्याला मार्गदर्शन करणार होती; पण प्रत्यक्षात एस. एम., ढाकणे, राजारामबापू आलेच नाहीत; मेळावा सायंकाळी साडेसहाला होता. कार्यकर्त्यांची वर्दळ–गर्दी सुरू झाली आणि सातच्या सुमाराला मेळाव्याचं प्रत्यक्ष काम सुरू झालं.

व्यासपीठावर मोजकीच मंडळी होती. नानासाहेब गोरे, ग. प्र. प्रधान, माजी मंत्री भाई वैद्य, माजी महापौर रामभाऊ वडके, पिंपरी-चिंचवडचे नगराध्यक्ष डॉ. श्री. श्री. घारे, बाबूमियाँ बँडवाले, श्रीमती अनुताई लिमये, पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष गणपतराव आवटे आदी मंडळी व्यासपीठावर विराजमान झाली होती. त्यातले बहुसंख्यजण पूर्वाश्रमीचे समाजवादी पक्षीय. पुणे शहर जिल्हा जनता पक्षाचे अध्यक्ष दि. ज. खिलारे अध्यक्षस्थानी होते.

' जयप्रकाशजींचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी ' झटण्याची प्रतिज्ञा याही पक्षाची आहे. व्यासपीठावर त्याचं प्रातिनिधिक दर्शन घडविणारी जयप्रकाशजींची प्रतिमा होती. आणखी एकच प्रतिमा होती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची. भाजपपेक्षा या जनता पक्षाचं वेगळेपण दर्शविणारी ही प्रतिमा होती.

खिलारे, गजानन गांजवे यांच्या भाषणांनंतर भाई वैद्य बोलले. भाजपकडे दुबळी असलेली वैचारिक बाजू या जनता पक्षाकडे बळकट करणारे भाईंसारखे नेते काही विचार मांडतील, असं वाटलं होतं; पण प्रत्यक्षात आरोप–प्रत्यारोप आणि त्याचं खंडण-मंडण एवढंच त्याचं स्वरूप राहिलं. पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांवरच्या टीकेची पुनरावृत्तीच या वक्त्यांनी केली. " भाजप कार्यकर्त्यांची ओढाताण करीत आहे. अॅड. ए. रहमान भाजपच्या मेळाव्याला गेलेले नसताना त्यांनी पक्षात प्रवेश केल्याचं जाहीर करण्यात आलं; पण मी त्यांना फोनवर विचारलं तेव्हा त्यांनी हे खरं नसल्याचं सांगितलं. " असं भाई म्हणाले. " कार्यकर्त्यांची अशी ओढाताण होणार असेल तर त्याही पातळीवर आम्ही उत्तर देऊ " असा इशारा त्यांनी दिला.

नंतर नानासाहेब बोलले. त्यांचं भाषण संयमित, बोचरं आणि शैलीपूर्ण होतं. ' जयप्रकाशजींचं स्वप्न आम्ही पुरं करणार ' असं ते म्हणतात. मग आम्ही काय चिरमुरे आणून खात बसणार आहोत ?" असा सवाल करून ते म्हणाले, " (भाजप) ते तसं सांगत असले तरी त्यांच्यापुढचं स्वप्न वेगळंच आहे, हे सर्वजण जाणतात. "

नानासाहेबांनी जनसंघावर टीका केली; पण मी कोणाला शिविगाळी करणार नाही, वावगा शब्द बोलणार नाही, हे प्रारंभीच सांगितलेलं सूत्र पाळून ते बोलले. " जनसंघाची पावलं चुकीच्या मार्गाने पडली आहेत. आमची हकालपट्टी झाली, असं ते म्हणतात; पण कुणीही त्यांची हकालपट्टी केलेली नाही. बाहेर पडायची तयारी त्यांनी आधीच सुरू केली होती" वगैरे पार्श्वभूमी सांगून नानासाहेब म्हणाले, " अडवाणी वगैरे म्हणतात, ' संघाशी संबंध असल्याचा आम्हाला अभिमान आहे. ' असा अभिमान जरूर असावा. मातेवर प्रेम असणं समजण्यासारखं आहे; पण मातेवर प्रेम आहे म्हणून काही कोणी नाळ ठेवून फिरत नाही. ती तोडावीच लागते. जनसंघीयांनी ही नाळ तोडलीच नाही ! "

कालच्या मेळाव्यात नव्या पक्षस्थापनेमागची भूमिका मांडण्यात आली होती, तिचा हा दुसरा भाग होता; पण त्यात आवेश नव्हता, फारसा प्रभावही नव्हता. नानासाहेबांच्या भाषणातूनही वैचारिक लाभ होऊ शकला नाही. एक गोष्ट विशेषत्वानं जाणवली. ती म्हणजे नानासाहेबांच्या भाषणात समन्वयवादी सूर होता. ' एकमेकांबद्दल वाईट बोलायचं कारण नाही. (अण्णा जोशींनी जनता पक्षातल्या सहकाऱ्यांसाठी चहा-पानसमारंभ केला. त्याबाबत बोलताना भाईंनी त्यांच्यावर टीका केली होती.) कार्यकर्त्यांच्या ओढाताणीबद्दलही मी कोणाला दोष देणार नाही. पक्ष दोन झाले म्हटल्यावर हे चालणारच ! ' असा त्यांचा हा सूर होता. कुणी सांगावं, कदाचित भावी काळातल्या राजकीय परिस्थितीत तोच महत्त्वाचा ठरणार असावा.

नानासाहेबांच्या भाषणानंतर दत्ता एकबोटे यांनी आभारप्रदर्शन केलं आणि हा मेळावा संपला. एस. एम., ढाकणे, राजारामबापू आलेच नाहीत. एस. एम. वर्ध्याला.

या मेळाव्यात ठराव नव्हते, तसंच अनेक वक्त्यांची भाषणंही नव्हती. त्यातून नेत्यांचं मनोगत कळलं; पण कार्यकर्त्यांच्या मनोगताचा मागोवा मिळाला नाही. ' खुली चर्चा ' इथेही नव्हती. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या आशा-अपेक्षा व्यक्त झाल्या नाहीत.

या मेळाव्याचा जमाव कालच्या मेळाव्याच्या जमावापेक्षा वेगळा होता. झोपडपट्टीवासियांपासून विविध स्तरांतल्या स्त्रिया आणि पुरुष त्यात दिसत होते. यात ब्राह्मणी चेहरे अभावानं आढळत होते. जनता पक्ष आणि भारतीय जनता पक्ष यांची प्रभावक्षेत्रं यातून

स्पष्ट होत असावीत. सहा-सातशे कार्यकर्त्यांच्या या मेळाव्यात तरुणांचं प्रमाण मात्र फारस नव्हतं. 'भाई वैद्य, खिलारे अशांसारखी तरुण मंडळी पक्षाचं कार्य जोमानं पुढे नेतील' असा विश्वास नानासाहेबांनी व्यक्त केला. याहून तरुण मंडळी या मेळाव्यात तुरळकच आढळली. या पक्षाच्या दृष्टीनं ही बाब चिंतेची आहे. ¤

जनता पक्ष फुटून नव्यानं स्थापन झालेला भारतीय जनता पक्ष आणि मूळ जनता पक्ष यांच्या पुण्यातल्या दोन मेळाव्यांचं हे चित्र. पूर्ण विभागणी दर्शवणारं. त्यातलं कुठलं अधिक आशादायक मानायचं, हा प्रश्न आज तरी बराचसा अनुत्तरितच मानावा लागेल ! ¤

# उध्वस्त

श्याम केळकर

'जनता पार्टी' १९७७ साली स्थापन झालेली जनता पार्टी–हे देशातील लाखो—कोटयवधी जनतेला पडलेले एक स्वप्न होते. 'कदमकुवा' येथील आपल्या निवासस्थानात–विकलांग होऊन पडलेल्या पण लोकशाही आणि समाजवादाच्या लढयासाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढू पाहणाऱ्या जयप्रकाशबाबूंचे ते स्वप्न होते. आणीबाणीत मृत्युमुखी पडलेल्या राजन, स्नेहलता रेड्डी, प्रभाकर शर्मा—अशांच्या स्वर्गस्थ आत्म्यांचे ते स्वप्न होते.

आम्ही जनता पक्षात होतो; पण आम्ही नव्हतो संघटना काँग्रेसचे; नव्हतो आम्ही जनसंघाचे, नव्हतो आम्ही समाजवादी; नाही आम्ही स्वतःला समजलो भारतीय क्रांतिदलाचे आणि नाही आम्ही मानले स्वतःला लोकशाहीवादी काँग्रेसचे ! संगमात पाणी मिसळल्यावर गंगेचे पाणी आणि यमुनेचे पाणी आपापसात भांडत राहील असे आम्ही कधी मानलेच नाही. अलाहाबादला आम्ही गंगा–यमुना मंगम पाहिला. या गंगा–यमुनेलाच पुढे ब्रह्मपुत्रा मिळाली आणि मग हा विराट जलाशय पुढे समुद्राला मिळाला. बंगालच्या उपसागरातील जलबिंदु आपापसात तू गंगेचा, तू यमुनेचा, तू ब्रह्मपुत्रेचा म्हणून भांडत असतील अशी आम्हाला कधी कल्पनाच आली नाही.

पण दुर्दैवाने आम्हाला तसे अनुभवायला मिळाले. आमचा पक्ष म्हणजे गंगा–यमुनेचा, कृष्णा–कावेरीचा, अशासारखाच एक पवित्र संगम आहे असे आम्ही मानले. काही लोकांनी याऐवजी आम्हाला खिचडी म्हटले तरी आम्हाला राग आला नाही. पवित्र वस्तु नसेल राहिली पण खाद्योपयोगी चविष्ट वस्तु म्हणून खिचडी त्याज्य आहे असे कधी वाटलेच नाही !

हुकुमशाही शक्तीचा पराभव व लोकशाही शक्तीची वाढ एवढे एकच ध्येय जनता पक्षाचे होते असे आम्ही मानले. आमच्यासारखे पुष्कळ होते. संघटना काँग्रेस, जनसंघ, समाजवादी, भाक्रांद, लोकशाहीवादी काँग्रेस या सर्वांशी सांप्रदायिक नसलेले पण लोकशाहीवर अढळ श्रद्धा असलेले व हुकुमशाहीचे चटके सोसलेले आम्ही सर्व जनता पक्षामागे उभे होतो; पण जनता पक्षात आम्हाला कोणी विचारले नाही. आमचे मिनू मसानी म्हणाले–'४२ वी घटनादुरुस्ती संपूर्ण रद्द करा!' त्यांचे कोणी ऐकले नाही. पु. ल. देशपांडे, बी. जी. वर्गीसनी सांगितले – 'आकाशवाणी स्वायत्त करा. दूरचित्रवाणी स्वायत्त करा !' त्यांचे कोणी मानले नाही. नाथवानी कमिशनने सांगितले – 'दाऊदी बोहरा समाजावरील बोहरा धर्मगुरूंची हुकुमशाही रद्द करा–' त्यांचे कोणी ऐकले नाही. 'समान नागरी कायदा करा. हिंदूंचे कायदे वेगळे, मुसलमानांचे कायदे वेगळे हा प्रकार बंद करा. धर्म ही फक्त वैयक्तिक खाजगी बाब राहू द्या. सार्वजनिक आचरण व कायदे यावर फक्त भारतीय घटनेचेच नियंत्रण असू द्या–' या सांगण्याकडेही कोणी लक्ष दिले नाही. शिक्षणात आमूलाग्र परिवर्तन करा, १०+२+३ याऐवजी सर्वसामान्य जनतेसाठी एका प्रकारचा व शास्त्रीय विषयात गती असणाऱ्या मुलांचा दुसऱ्या प्रकारचा असे दोन शिक्षणप्रवाह सुरू करा ( Education System for Varied tolents ) असे डॉ. जॉन वगैरे शिक्षणतज्ज्ञांनी सांगितले. कोणीच ध्यान दिले नाही. ऑक्ट्रॉय, सेल्सटॅक्स, एक्साइज ड्यूटी असे मल्टी पॉइंट टॅक्सेस रद्द करून टर्नओव्हर ( उलाढाल ) कर नावाचा एकच कर बसवा. या तऱ्हेने भ्रष्टाचार कमी करा व कार्यक्षमता वाढवा असे अनेकांनी सांगितले; पण तेव्हा कोणी ऐकले नाही. कुटुंब–नियोजनाला उच्चतम प्राधान्य द्या – कोणी मनावरच घेतले नाही !

अशी किती उदाहरणे सांगावी ! लोकशाहीचा पाया दृढमूल करणे, हुकुमशाही प्रवृत्तीला पायबंद घालणे, भ्रष्टाचारनिर्मूलन व समाजाची सर्वांगीण प्रगती यासाठी या सर्व गोष्टींची आवश्यकता नव्हती का ?

पण या गोष्टींचे महत्त्व जनता पक्षाच्या तथाकथित नेत्यांना वाटलेच नाही. किसानाचा मुलगा पंतप्रधान व्हावा आणि हरिजनाचा मुलगा पंतप्रधान व्हावा, अशा हेतूने काही जनता पक्षाची स्थापना झालेली नव्हती; पण काही लोकांना तसे वाटले. 'डाव्या शक्तींची एकजूट' करण्याच्या स्वप्नात 'प्रतिचाणक्य' मधु लिमये रमून जाऊ लागले. सर्व जुन्या–नव्या काँग्रेसजनांना एकत्र आणण्याच्या स्वप्नात जगजीवनरामबाबू गुंगू लागले आणि हिंदूंचे राष्ट्र स्थापन करण्याच्या एका जुन्याच स्वप्नाच्या नानाजी देशमुख, सुंदरसिंग भंडारी व जगन्नाथराव जोशी मागे लागले.

'लहान मुलांनादेखील समजतील अशा गोष्टी न समजणारी ही मंडळी भांडू लागली. आज ५०–६० च्या आसपास असलेले नानाजी देशमुख संघात आम्ही जाणारच असा हट्ट धरून बसू लागले. सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः। हे वचनदेखील लक्षात घ्यायला ते तयार नाहीत. त्याचप्रमाणे या वयातील मंडळी संघात, आज रोज गेली नाहीत की, त्यांच्यावरील संघाचे सस्कार संपले असे मानायला चंद्रशेखर तयार आहेत. या घटकेला संघात जाण्या वा न जाण्याने काय फरक पडतो तेच लक्षात येत नाही; पण चंद्रशेखर, ना. ग. गोरे फरक पडतो असे मानायला तयार आहेत.

सगळेच जण जनता पक्षाचे आहोत म्हणून सांगत आहेत. या संबंधात एक उपनिषदातील गोष्ट सांगावीशी वाटते. माणसाच्या शरीराचे अवयव एकमेकात भांडू लागले. हात म्हणू लागले मीच श्रेष्ठ, पाय म्हणू लागले मीच श्रेष्ठ, डोळे म्हणाले मीच श्रेष्ठ, कान

म्हणाले मीच श्रेष्ठ, शरीरात निरुपयोगी अशी एकच वस्तु आढळली ती म्हणजे आत्मा—! अवयवांनी भांडणाचा निकाल लावण्यापूर्वी निरुपयोगी वस्तूची हकालपट्टी करायचे ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी ती केली. अर्थातच शरीराचे रूपांतर प्रेतात झाले.

जनता पक्षाच्या अवयवांच्या भांडणाने जनता पक्षाचा आत्मा केव्हाच उडाला आहे. आता उरले आहेत ते निष्प्राण तुकडे! आमच्यासारख्यांनी कुठे जावे? आम्हाला वाजपेयींबद्दलचा आदर आहे, चंद्रशेखर, मधु दंडवते यांचेशी पण आमचे नाते स्नेहाचे आहे. आम्हाला कुठल्याच तुकड्यात डावे-उजवे करावेसे वाटत नाही. जयबाबूंच्या शब्दात सांगायचे तर—आमचे स्वप्न उद्ध्वस्त होऊन त्याचे तुकडे आमच्या सभोवती इतस्ततः विखरून पडले आहेत. जयप्रकाशजींची स्वप्ने वारंवार उध्वस्त झाली; पण त्यांनी स्वप्ने पाहणे बंद केले नाही. आम्हीही त्यांचेच शिष्य आहोत. आम्हाला अजूनही वाटते, या तुकड्यांना जोडणारा, त्या जोडलेल्या शरीरात प्राण ओतणारा, एखादा प्रकाश पुन्हा येईल. जनता पक्ष मृतवत् झाला असेल, कदाचित् पूर्ण मेलाही असेल; पण आमच्या स्वप्नात संजीवनी मंत्र देणारे शुक्राचार्यदेखील येऊ शकतात. आमच्या स्वप्नात गरुड अमृताचे कुंभ आणू शकतात. आमच्या स्वप्नात अच्युतराव पटवर्धन—जयप्रकाशांची जागा घेऊ शकतात. आम्ही जनता पक्षाला मरू देणार नाही. म्हातारी माणसे भांडत बसली आहेत. त्यांना अजून आपल्या जुन्या घरांच्या आठवणीने रडू येत आहे; पण आपण तरुण आहोत. पुन्हा पाठीमागे जाऊन पाहाणे हे कचखाऊपणाचे लक्षण आहे. अवनतीचे आहे. आपण गतीचा कायदा पाळू या. 'प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा।' असे केशवसुतांनी आपल्याला मागेच सांगितले आहे. वयोवृद्ध माणसाचा आदर असावा; पण वयोवृद्ध माणसांचे आचरण भीष्माचार्य, द्रोणाचार्य यांचेसारखे असेल तर त्यांचेपाठीमागे लागण्यात अर्थ नाही. आपण असे सांगू या—कधीच कोणत्याही राजकीय पक्षाशी संलग्न नसलेल्या एखाद्या व्यक्तीला जनता पक्षाचे अध्यक्ष करा. नकोत चरणसिंग, नकोत जगजीवनराम—नकोत. दंडवते नकोत वाजपेयी! जनता पक्षाशी घटस्फोट घेण्याचे ज्याचे मनातदेखील येणार नाही अशी एखादी व्यक्ती आम्हाला अध्यक्ष हवी!

आमची स्वप्ने पूर्ण होतील का? गोकुळात कोणी नंदलाल जन्माला आलाय का? सध्या तरी सर्वत्र यादवीचेच थैमान चालू दिसत आहे. आपापसात भांडून यादवांनी स्वतःचाच निर्वंश करून घेतला. त्या यादवांचे वंशज सगळे जनता पक्षाचेच वाट्याला का यावे? आणीबाणीत ही सर्व मंडळी तुरुंगात होती. आम्हाला आता असं वाटू लागलं आहे की तुरुंग हीच यांची योग्य जागा आहे, लाखो लोकांचा विश्वासघात करणाऱ्यांना तुरुंगवास ही शिक्षा सौम्यच होय! ही नेतेमंडळी तुरुंगात गेली की, मग भांडणाची मुळेच नाहीशी होतील. तरुण नेतृत्व पुढे येईल. असे तरुण नेतृत्व, की जे भूतकालावर प्रेम करत न बसता भविष्याचे वेध घेईल. वर्तमानाचे अवधान ठेवील व समन्वयवादी असेल, सर्वेषाम् अविरोधेण असं खोटं खोटं म्हणत प्रत्यक्षात सर्वांच्याच विरुद्ध वागणारे नसेल. महान् स्वप्न पाहण्याची व त्यासाठी सर्वस्वाचा होम करण्याची तयारी फक्त तरुणांमध्येच असते. मृणाल गोरे, जॉर्ज फर्नांडिस, चंद्रशेखर, धारिया, वाजपेयी, दंडवते, अडवानी, अहिल्या रांगणेकर यांनी पण एकदा—अंगार फुलवले होते. आम्हाला त्यांचेबद्दल अजूनही आदर आहे; पण तरीही हे अंगार विझत चालले असतील तर त्यांचेवर आता प्रेम करणे उचित नाही. संभाजीमहाराजांच्या पश्चात् राजारामहाराजांनीही ज्या निर्धाराने मराठी साम्राज्य टिकविले त्या निर्धाराने आपण जनता पक्ष टिकवू या! जनता पक्ष सोडण्यासाठी ज्यांना निमित्तच शोधायची आहेत त्यांना जाऊ द्या! संशयास्पद व्यक्तीच्या पक्षातील अस्तित्वामुळे संपूर्ण पक्षाचीच विश्वासार्हता नाहीशी होते. एका व्यक्तीच्या इच्छाशक्तीने साम्राज्ये धुळीला मिळू शकतात. एक कृष्ण सगळ्या सैन्यापेक्षा भारी असतो. आपण संख्येच्या मागे लागणे बंद करू या. जनता पक्षाला पुन्हा वैभवाप्रत जायला फार काळ लागणार नाही! □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

रंगभूमी

## दिनकर पुरोहिताचा खून :

विनया खडपेकर

दिनांक २५ मार्च. छबिलदास नाटयगृह- 'उन्मेष' निर्मित दिनकर पुरोहिताचा खून या नाटकाचा पहिला प्रयोग. जाहीर झालेली वेळ रात्री आठ; पण आठ झाले, सव्वाआठ झाले तरी नाटकाला सुरुवात नाही ! जवळजवळ आठ चाळीसला नाटक सुरू झाले. या उशीरामुळे आधीच कंटाळा आला होता. नाटक सुरू झाल्यावर तो वाढतच गेला. ते संपेपर्यंत तर अगदी चीड आली !

दोन शेजारीशेजारी राहणारी जोडपी. रमा-उमाकांत. उमा–रमाकांत. रमेला छत्र्यांचा व्यवसाय करायचा आहे. उमाकांत बुद्धिबळात दंग. उमेला अमेरिकेला जायचे आहे. रमा–कांताला निवडणूक लढवायची आहे. दोन्ही पतिपत्नींना एकमेकांचे छंद मान्य नाहीत. चौघेजण गप्पाटप्पा करतात. आपली नावे नेमकी शेजारच्याच्या पत्नीशी जुळणारी कशी याची चर्चा करतात. मग दिनकर पुरोहित नावाचा गुप्त पोलीस येऊन सांगतो, ' 'माझ्यासारख्याच दिसणाऱ्या दिनकर पुरोहित नावाच्याच दुसऱ्या व्यक्तीचा येथे खून होणार आहे. तो मला वाचवायचा आहे. तुम्ही घाबरू नका !' तो जातो. वेळ कटवण्यासाठी हे चौघे गप्पा उकरून उकरून काढतात. रमा चहासाठी आत जाते, तर आत माणूस पाहून किंचाळून बाहेर येते. रमाकांत स्वयंपाकघरातून तो माणूस म्हणजे एक प्रेत बाहेर आणून दाराबाहेर फेकतो. त्या प्रेताचा चेहरा गुप्त पोलिसाचाच; पण पोषाख वेगळा. नंतर तो मेलेला माणूस उठून आत येतो. हे चौघे विचारतात, 'असं कसं झालं ?' तो उत्तर देतो, 'नाटकात असंच असतं ! बाहेर गेलेला माणूस आत येतो. हे विचारतात, 'पण मग तो कोण ?' तो म्हणतो 'ते मी कसं सांगणारं ?' याच धर्तीवर आणखी एकदोन प्रश्नोत्तरं होतात आणि नाटक संपते.

आता हे सगळं काय आहे ते मी तरी तुम्हाला कसं सांगणार ?' हे सगळे पाहून मतीच कुंठीत झाली ! माझ्या आकलन-शक्तीप्रमाणे हे एका रहस्याभोवती रचलेले नाटक आहे. बाकी निवडणूक, अमेरिका, छत्र्या वगैरे सगळे फालतू. रहस्य हे मुख्य; पण ते मुळी उलगडलेच नाही. गेल्याच 'माणूस'-मध्ये रहस्य न उलगडलेल्या रहस्यमय चित्र-पटासंबंधी वाचले. तेव्हा वाटते ही एक आता नवी लाट आली असावी. 'गर्भपात, बला-त्कार, किंवा तत्सम दृश्ये असलेली नाटके झाली. रहस्य उलगडणारी रहस्यमय नाटकेही होऊन गेली. म्हणून आता ही नवी तऱ्हा— रहस्य तर दाखवायचे पण ते शेवटपर्यंत कळू द्यायचेच नाही !

रमेचे डोक्यावर पुस्तक घेऊन नाचणे, रमेने चष्मा वर केल्यानंतर रमाकांतने तिचे डोळे पुसणे, दिनकर पुरोहिताने सगळ्यांची नावे ओळखणे, रमाकांतला मुलाच्या खुनाच्या धमकीची चिठी येणे, उमाकांत–रमा यांनी अंडी फोडून खाणे, उमाकांताची बुद्धिबळाची मोहरी, बुद्धिबळाच्या पटाला चिकटलेली असणे; या सगळ्या कृतींचा अर्थ काय करायचा ? त्यांची एकमेकांशी सांगड कशी घालायची ? निरर्थक बाष्कळपणा याखेरीज या प्रकाराला माझ्याजवळ दुसरे शब्द नाहीत. काही वाक्यसमूहांना नाटक म्हणायचे–वर्तमानपत्रात जाहिराती देऊन ते चक्क रंगमंचावर सादर करायचे; केवढे हे धाडस !

लेखक, दिग्दर्शक, कलाकार हे शब्दही प्रस्तुत नाटकाच्या संदर्भात वापरणे नकोसे वाटते; पण मडकी करतो तो कुंभार याच चालीवर रंगमंचावर वावरतात ते कलाकार, कागदाला पेन लावतात ते लेखक इतक्या मर्यादित अर्थाने हे शब्द मी येथे वापरते. या नाटकाचे लेखक श्री. चंद्रकांत देशपांडे, दिग्दर्शक श्री. प्रकाश बुद्धिसागर, विद्या पटवर्धन, उदय म्हइसकर, प्रकाश बुद्धिसागर आदि कलाकार या सगळ्यांनी मिळून छबि-लदासच्या रंगमंचावर तब्बल दोन तासांचे एक निरर्थक बाष्कळ नाटक केले.

चाळा । भाऊ पाध्ये

## नाटक 'गुलाम'

### ट्रॅजो–फॅन्टसी ? की हितोपदेश ! –की नुसतेच आत्माराम भेंडे ?

शन्नांच्या स्वतंत्र सामाजिक नाटक 'गुलाम' याने सध्या रौप्यमहोत्सव साजरा केला आहे. ह्या नाटकाचे इतके प्रयोग पार पडले असतील याची मला कल्पनाही नव्हती. काही नाटय–समीक्षकांनी तर त्यावर आपले कलम चालवलेही नाही असे मला समजले. तेव्हा हे नाटक रौप्यमहोत्सवी ठरूनही त्या संबंधात लिहिणे अगदीच अनावश्यक नाही. शिवाय नाटक शन्नाचे आहे. शन्ना हा एक लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेच. त्यामुळे विशेष आपुलकीने त्याच्या नाटका-संबंधात लिहिणे मला जरूर वाटते.

व्यावसायिक नाटकाच्या प्रेक्षकांचे मानस-शास्त्र सांगते की कुठल्याही नाटकाची अॅक्शन पहिल्या पंधरा मिनिटांमध्ये सुरू झाली पाहिजे. (एरव्ही प्रेक्षक बोअर होऊन तिकि-टाचे पैसेही मागण्याचा धोका असतो !) 'गुलाम' या नाटकात एका एस्टॅब्लिश्ड, बंगला, गाडी, आपल्या परिश्रमाने आणि कर्तबगारीने कमावणाऱ्या इन्कमटॅक्स कन्सल्टंट यशवंत खानोलकर (रमेश देव) याजकडे एक इन्कमटॅक्स कारकून कर्णिक (आत्माराम भेंडे व त्याची पत्नी मंगला (सीमा देव) हे आपले भविष्य जाणून घेण्या-साठी येतात. पहिल्या अंकाचा पडदा संपण्या-पूर्वी ते आपले भविष्य ज्यामध्ये सापडू शकेल अशी डायरी खानोलकराकडून हस्तगत कर-ण्यात यशस्वी होतात. पहिल्या अंकातील डेव्हलपमेंट एवढीच आहे. दुसऱ्या अंकामध्ये त्या डायरीतील भविष्याचा पडताळा येऊन हा इन्कमटॅक्समधला कारकून आपल्यालाही खानोलकराप्रमाणे बंगला–गाडी निश्चित मिळणार अशी खात्री बाळगू लागतो. त्याच्या भविष्याच्या वेडाची साथ थोडी-फार त्याची पत्नी मंगला (सीमा)! हिलाही लागते. इन्कमटॅक्स कचेरीमध्ये कर्णिकांच्यावर एक

बापट येते, तेही डायरीतील भविष्यामुळे आणि त्यानंतर पहिली कृती कर्णिक करतो ती म्हणजे नोकरीचा राजीनामा देण्याची. त्याचे बिल्डिंग कन्स्ट्रक्शनच्या धंद्यात पडण्याचे बेत चालू असतात. डायरीमध्ये लिहिलेल्या व घटनांच्या वळणाने समांतर जाण्याचे कर्णिकनेही ठरवले असल्यामुळे, तो बिनधास्त असतो.

दरम्यान घरात एक सुखद घटना घडते ती म्हणजे कर्णिकांची मुलगी आशा आणि खानोलकरांचा मुलगा (राजा बापट) यांच्या लग्नाची. हे वळणही तद्दन डायरीतील घटनेबरहुकुमच घडते.

परंतु कर्णिकांनी राजीनामा दिल्यानंतर पहिली धक्का देणारी घटना घडते ती म्हणजे ही डायरी खानोपकरांची नाही, हे त्यांचा मुलगा सिद्ध करतो. खानोलकरांची नाही म्हणजे गाडी, बंगला नाही, राजीनामा देण्यात प्रचंड चूक, त्यात बिल्डिंग कन्स्ट्रक्शनमध्ये भागीदारीची बोलणी मोडून, डायरीतील आणखी एका घटनेशी मेळ चुकतो आणि इन्कम टॅक्स कारकून कर्णिक यांच्या डोळ्यासमोर काजवे चमकतात. अशा रीतीने दुसरा अंकही संपतो.

'गुलाम' या नाटकाच्या दोन अंकांमध्ये आपल्याला संघर्षाचे बीज तर कुठे आढळतच नाही आणि 'अ‍ॅक्शन'ची सुरुवात जवळजवळ दुसऱ्या अंकाच्या अखेरीस होते व तिथेच ती संपते. हे नाटक नुसते वाचले तर तद्दन ड्रँब (रुक्ष) वाटेल, कदाचित निद्रानाश असलेल्या व्यक्तीला अ‍ॅक्सीर इलाज म्हणून हे पहाण्यास मांगावे अशीच परिस्थिती आपण अनुभवतो; पण, हे नाटक रौप्यमहोत्सवी झाले. किंबहुना मला ते पहाताना सुसह्य झाले. याचे एकच कारण म्हणजे आत्माराम भेंडे. आत्माराम भेंडे हे मराठी रंगभूमीवरील अशोककुमार आहेत असे म्हटले तर वावगे होणार नाही. अशोककुमार या निनेमानटावर अनेक वेळा सामान्य कथेमध्ये जान ओतण्याची पाळी येते,—'आखरी इन्साफ' हे त्याचे उदाहरण आहे. त्यांना ठाऊक असते की, आपण आपली भूमिका सिरिअसली निभावून या कथेला ती उपकारक ठरणार नाही. एरवी ते किशोरकुमार या सरफिऱ्या कलावंताचे भाऊ आहेत. त्यांच्याहीमध्ये थोडासा तो अंश आहेच. म्हणून ते आपली भूमिका 'नॉन–सिरिअस' पातळीवर नेतात. काही ओव्हर अ‍ॅक्टिंग, काही चावटपणा, द्वयर्थी संवाद वगैरे वगैरेचे असे ते काही मिश्रण करून आपली अदाकारी पेश करतात की त्याची एखाद्या सामान्य प्रेक्षकाला गंमत वाटावी. आत्माराम भेंडे नेमके हेच करतात असे माझे मत बनले आहे. भविष्याच्या प्रत्येक पडताळ्याबरोबर उडणारा, छातीठोक हेकट श्रद्धा असलेला, गडबड्या व गडबडणारा, आशा आणि निराशेच्या दोन टोकांवर जाऊन पोहोचल्यावर वेड पांघरून पेडगावला जाऊन पोहोचणारा वगैरे तद्दन सीरिअस अदाकारी पेश करून भेंडे स्टेजवर जीवंतपणा कायम ठेवतात. मी भेंड्यांच्या या भूमिकेचा चहाता आहे, जितका अशोककुमार यांच्या नॉन–सिरिअस भूमिकांचा आहे. 'गुलाम'मध्ये एका प्रसंगी ते खुर्चीवर नशेमध्ये बसलेले असतात आणि नुसतेच जोराने हात हालवत असतात. या कृतीचं इतकं हसू आपल्याला येतं, जितकं स्टेजवर एखाद्या महान विनोदी नटाच्या डायलॉगमुळे येणार नाही! त्यांची ही अ‍ॅक्शन अर्थातच निरर्थक असते.

आत्माराम भेंडे यांची ही भूमिका रास्त वाटते याचे दुसरे एक कारण आहे. या नाटकातील सर्व घटना आणि सर्व पात्रे त्यांच्याभोवती फिरतात. अर्थातच नाटककाराच्या नाट्यरचनेचा हा ढिसाळ भाग आहे. खरे तर, हे नाटक त्यांच्या पत्नी मंगलाबाई यांच्याभोवती फिरावयास पाहिजे, हे या नाटकाचा शेवट झाल्यावर लक्षात येते. या डायरीत ज्याचे भाग्य लिहिले आहे, त्या यशपाल खानोलकर (कॅनडामध्ये रहाणारा यशवंत खानोलकरांचा भाऊ–पुन्हा रमेश देवच) यांची पत्नी अशाच वेळी मरते त्याचप्रमाणे मंगलाबाईचाही मृत्यु जवळ आलेला असतो. मंगलाबाई आणि त्याबरोबरच सीमा या नेहमीच अंधारात राहल्या. शन्नानी एकूणच या पात्रावर अन्याय केला आहे.

अर्थातच, शन्ना हे तसे crafty लेखक आहेत. 'गुलाम' नाटक पहाताना, मला त्यांच्याचप्रमाणे crafty आयडीयाबाज हृषिकेश मुखर्जी यांची आठवण होते. हृषिदाप्रमाणे शन्नाही तऱ्हेवाईक लकबी असलेली पात्रे मधून मधून पेश करून एरव्ही रुक्षपणे जाणाऱ्या कथानकाला एक समांतर हलकीफुलकी झालर निर्माण करत असतात. सनावळचा तोंडपाठ असलेले, always या शब्दाचा वेळी–अवेळी–वापर करणारे तालीम मास्तर (अनंत मिराशी) किंवा किरट्या आवाजात बोलणारे घाबरट इन्कमटॅक्सऑफिसर खोपकर ही पात्रे शन्नानी व्यवस्थित मॅनिप्युलेट करून पेश केली आहेत. शन्नांना सर्वांत उत्कृष्ट प्रवेश जमला आहे तो आशा आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या खानोलकरांच्या सुपुत्राचा. घरात नसलेल्या कर्णिकांना चकमा देऊन चान्स घेण्याची त्यांची धडपड झकास! या सुपुत्राचे काम केले आहे राजा बापटाने. बरेच वर्षानंतर राजा बापट आपल्या तऱ्हेवाईक लकबीसह पेश झाला आहे. रमेश देव इन्कमटॅक्सकन्सल्टंटच्या भूमिकेत दातओठ चाऊन बोलत असावेत आणि कॅनडातील भावाच्या भूमिकेत तर ते तद्दन 'तुझे आहे तुजपाशी' मधले काकाजी वाटले. त्यांचे संवाद मला मागच्या रांगेत नीट ऐकू येत नव्हते हा त्यांच्या भूमिकेतला प्रमुख दोष.

तर शन्नांच्या या नाटकाला काय म्हणावे? गुन्हेगारी शास्त्राप्रमाणे दोन हातांवरील रेषा कधीच सारख्या असू शकत नाहीत. नाही तर फिंगर–प्रिंटस् घेण्यात काही तथ्यच रहाणार नाही; परंतु जर शन्नांच्या म्हणण्याप्रमाणे दोन किंवा अनेक व्यक्तींच्या हस्तरेषा सारख्या असू शकतात, असे गृहीत तत्त्व मान्य केले तर हे नाटक फॅन्टसीच आहे, असे म्हणावे लागेल; परंतु फॅन्टसीचा हळुवारपणा मात्र न अनुभवता अखेर आपल्याला एका शोकांताला सामोरे जावे लागते. तर आपण या नाटकाला ट्रॅजी–फँटसी म्हणू असा काही प्रकार नसेलच तर शन्नांनी तो सुरू केला आहे असे म्हणू.

पण, त्याचबरोबर एक दोष शन्नांच्या कपाळी मारावा, तो हा की, नाटकाच्या अखेर ते प्रेक्षकांना 'बापहो, आपण भविष्य जाणण्यासाठी वेडे होऊ नका' असा हितोपदेश करण्याच्या मागे लागले आहेत असे फीलिंग आले आहे. अखेर आपली भाग्यरेषा जाणून घेण्यासाठी पडदा पडता आलेल्या तरुणाला आपण सर्वांच्या हातावरील रेषाच पुसून टाकू असे काकाजी न सांगते तर बरे. भविष्य वर्तवली जातील, भविष्ये खरी ठरतील वा खोटी ठरतील; पण भविष्यावर विश्वास ठेवणारी माणसे येतच रहाणार, त्याला कुणाचा काय इलाज आहे?

बाय द वे शन्ना म्हणजे सुप्रसिद्ध साहित्यिक शं. ना. नवरे बरे! त्यांनी 'धुक्यात हरवली वाट' हे एक चांगले नाटक लिहिले आहे. पुन्हा तसे केव्हा लिहितील त्याची वाट पाहू. ☐

चित्रपट । सदानंद बोरसे

# The Front Page

## एक अफलातून प्रेक्षणीय मुखपृष्ठ

शिकागोचे 'द एक्झामिनर' नावाचे वर्तमानपत्र. त्याचा हिल्डी जॉन्सन (जॅक लेमन) हा पत्रकार मोठा हिकमती, नाना युक्त्या-प्रयुक्त्या लढवून अगदी आतील गोटातील बातम्या काढून आपला पेपर सतत सगळ्यांच्या पुढे ठेवण्यात अत्यंत वाकबगार. पण आपले लग्न ठरल्याने आपल्या या नोकरीला हिल्डी रामराम ठोकण्याच्या विचारात असतो. सहा जूनला तो आपल्या वाग्दत्त वधूबरोबर दुसऱ्या गावी जाणार असतो; पण त्याच दिवशी एका बातमीतच अडकतो आणि हाडात मुरलेल्या पत्रकारितेमुळे बातमीतच गुरफटतो. अखेर जणू 'लग्न-बिग्न आपल्यासारख्या पत्रकाराचे काम नाही.' हे उमजल्यामुळेच की काय हिल्डी एक्झामिनरसाठीच काम करीत राहतो.

फार्सच्या वळणाचे हे कथानक आणि त्याच वळणाला वाढवल्यामुळे बनलेला 'The Front Page' हा एक धमाल चित्रपट पुण्यात प्रदर्शित झाला. दिग्दर्शक आहेत बिली विल्डर.

हिल्डीची भूमिका साकारणारा जॅक लेमन आणि 'एक्झामिनर'च्या संपादकाच्या—वॉल्टर बर्न्सच्या भूमिकेत चमकणारा वॉल्टर मॅथ्यू या दोन मजबूत खांबांनी हा विनोदी चित्रपट चांगलाच पेलला आहे. सतत काही तरी गुणगुणत आपल्याच नादात राहणारा, खास बातमी फक्त आपल्यालाच मिळावी यासाठी धडपडणारा हिल्डी आणि लग्नामुळे हिल्डीने पत्रकारिता सोडू नये म्हणून त्याच्या वधूलाच त्याच्याबद्दल खोटेनाटे सांगून लग्न मोडण्याचा प्रयत्न करणारा वॉल्टर आणि असे दोघे एकत्र आल्यानंतर आपली हेडलाइनची बातमी इतरांपासून लपविण्यासाठी चाललेली दोघांची धडपड, त्यातून जन्मणारे घोटाळे, ते निस्तरण्यासाठी आणखी धडपड आणि त्यातून निघणारे ब्रह्मघोटाळे हे प्रेक्षकाला केवळ गुदगुल्या करीत राहतात.

चित्रपटाचा शेवट म्हणजे तर सगळ्याचा कळस आहे. सर्व घोटाळे, ब्रह्मघोटाळे निस्तरून हिल्डी आपल्या वधूबरोबर-पेगीबरोबर जाण्यासाठी रेल्वेस्टेशनवर येतो. त्याला पोहोचवायला म्हणून वॉल्टर अर्थातच बरोबर आहे. बरं झालं, अगदी वेळेवर पोहोचले; गाडी सुटायच्याच बेतात होती. गाडी सुटत असताना वॉल्टर एक सोन्याचे घड्याळ हिल्डीच्या हातात कोंबतो. 'हिल्डी, या वर्षीचा बेस्ट न्यूजपेपरमॅन म्हणून आपल्या चीफनं तुला हे घड्याळ दिलंय. तू फक्त एकच कर—त्याच्यावर माझं नाव कोरलंय, ते खोडून तुझं टाकून घे.' गाडी सुटते, वॉल्टर हिल्डीला प्रेमळ निरोप देतो. गाडी दिसेनाशी होताच वॉल्टर पुढच्या स्टेशनला फोन करतो, 'हिल्डी जॉन्सन नावाचा एक भुरटा माझं घड्याळ चोरून पळालाय, त्याला पकडा!'

या ठिकाणी चित्रपट संपतो किंवा या ठिकाणी चित्रपटातील ती छोटीशी घटना संपते. चित्रपट पुढे चालूच राहतो आणि चित्रपटातील पात्रांच्या उर्वरित आयुष्यातील flashes आपल्यापुढे येतात.

—हिल्डी (पेगीशी लग्न न करता) पुन्हा शिकागोला परतला, 'द एक्झामिनर'मध्येच काम करू लागला आणि पुढे कार्यकारी संपादकही बनला.

—वॉल्टर पुढे वर्तमानपत्रातून निवृत्त झाला आणि विद्यापीठात पत्रकारितेचा प्राध्यापक बनला.

याबरोबरच काही पात्रांबद्दल असा खमंग मजकूरही आहे.

— मेयर पुढे निवडणुकीत पुन्हा निवडून आला. नंतरही बरीच वर्षे तो उपराष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतील पडेल उमेदवार होता.

तर असा हा धमाल चित्रपट जॅक लेमन आणि वॉल्टर मॅथ्यू यांनी तोलला आहेच; पण अन्य बारीक—सारीक भूमिकांमधील कलाकारांनीही आपापल्या गवळ्यांच्या काठ्यांचा आधार त्याला मनोभावे दिला आहेच. हिल्डीच्या जागी आलेला नवीन तरुण पत्रकार, प्रेस—रूममध्ये येणाऱ्या—जाणाऱ्यांच्या टवाळ्या करीत बसलेला पत्रकारांचा कंपू, पोलिसांच्या हातून पळालेला फाशीचा कैदी इत्यादी सगळेच जण केवळ भन्नाट!

चित्रपटात पत्रकार, वृत्तपत्रव्यवसायातील माणसांचे आयुष्य यांवर काही झकास मल्लीनाथी आहे. उदाहरणार्थ—'बाई ग, वाटेवरच्या चोराशी लग्न कर; पण पत्रकाराशी करू नकोस!'

आगळे कथानक, प्रत्येक विनोदी प्रसंगाला बारीक-सारीक गोष्टीमधून दिलेला फुलोरा आणि कलाकारांचा जिवंत अभिनय यांनी हे मुखपृष्ठ चांगलेच आकर्षक आणि प्रेक्षणीय बनविले आहे. *

# मा. दीनानाथ स्मृतिदिन

'मंगेशीपासून मुंबईपर्यंत मी रुपये पसरून या मुलाला माझ्या कंपनीत (गंधर्व नाटक मंडळी) आणले असते.' असे उद्गार काढून बालगंधर्वांनी ज्या कलाकाराचा त्याच्या बालपणीच गौरव केला, आपल्या अनोख्या आगळ्या तेजाने मराठी संगीत नाटकांच्या नभांगणात जो सुमारे अडीच तासांपर्यंत झळाळत राहिला आणि परिस्थितीच्या थपडांनी अकालीच निळखून पडला अशा एका थोर कलावंताचा कै. दीनानाथ मंगेशकरांचा अडतिसावा स्मृतिदिन या वर्षी दि. २४ एप्रिल रोजी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे.

आतापर्यंत मंगेशकर कुटुंबियांतर्फे आणि दीनानाथांच्या चाहत्यांतर्फे वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या रूपाने हा स्मृतिदिन मुंबईतच साजरा करण्यात येई; पण संगीत रंगभूमीच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त चोखंदळ रसिकतेची प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या पुणे शहरात तो साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त दि. २४, २५ व २६ एप्रिल रोजी टिळक स्मारक मंदिरात भावबंधन, स्वयंवर आणि मृच्छकटिक या तीन नाटकांचे प्रयोगही आयोजित करण्यात आले आहेत. या वेळीच सर्वश्री परशुराम सामंत, चंद्रकांत गोखले, बाळकोबा गोखले, गणपतराव मोहिते, श्रीपाद जोशी, मामा पेंडसे, बाबी बोरकर, चित्तरंजन कोल्हटकर या मा. दीनानाथांबरोबर काम केलेल्या कलाकारांचा सत्कारही करण्यात येणार आहे. याच वेळी कै. जयराम हर्डीकरांच्या कुटुंबियांना दहा हजार रुपये आणि त्याच अपघातात मृत्यू पावलेल्या बॅकस्टेजच्या दोन कलाकारांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच हजार रुपये मदत म्हणून देण्यात येणार आहेत. □

# सुशिक्षित बेकाम

आपल्यां देशापुढील
एक प्रचंड प्रश्न



देशातील कल्पक आणि जिद्दी तरुणांना
महाबँक व्यवसाय मार्गदर्शन आणि अर्थसहाय्य करते.
अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या
आमच्या शाखेस आजच भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कचेरी: लोकमंगल १५०१ शिवाजीनगर पुणे - ४११००५)

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा.

NAVADKAR.

SKY/F/8004